
# वृषाली जोशी

# लिओ टॉलस्टॉय




# इव्हान इलयीचचा मृत्यू

# इव्हान इलयीचचा मृत्यू

मूळ लेखक – लिओ टॉलस्टॉय

मराठी अनुवाद – वृषाली जोशी

© वृषाली जोशी
सर्व हक्क अनुवादिकेच्या स्वाधीन. या अनुवादातील कोणताही भाग कोणत्याही माध्यमातून प्रसिद्ध करण्यासाठी अनुवादिकेची पूर्व परवानगी घेण्याची आवश्यकता आहे.
दूरभाष ९९२१७४६२४५

**या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!**

# इव्हान इलयीचचा मृत्यू

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो.

मजा येते.

पण

## तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हालाही आनंद मिळेल

**आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.**

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना हे पुस्तक मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# इव्हान इलयीचचा मृत्यू


लेखक : लिओ टॉलस्टॉय

अनुवादिका: वृषाली जोशी

चलभाष : ९९२१७४६२४५

इमेल – vrishalisjoshi@gmail.com



या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशन : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन :  ५ एप्रिल २०२१

©esahity Pratishthan®2021


• विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध .

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता .

• हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.


The Death Of Ivan Ilyich By Leo Tolstoy

# इव्हान इलयीचचा मृत्यू : लिओ टॉलस्टॉय



प्रसिद्ध रशियन लेखक टॉलस्टॉयची ‘इव्हान इलयीचचा मृत्यू’ ही कादंबरी १८८६ मध्ये प्रसिद्ध झाली. परीक्षण दंडाधिकारी असलेल्या इव्हानचा मृत्यूपर्यंतचा अटळ प्रवास यात दाखवला आहे. उच्च समाजवर्गीय आदर्शांनुसार वागणूक ठेऊन तो आयुष्यात यश मिळवतो. पण कुटुंबाशी व्यक्तिगत संबंध चांगले न राहिल्याने, तो असमाधानी रहातो.

# THE DEATH OF IVAN ILYICH
By Leo Tolstoy
इव्हान इलयीचचा मृत्यू



# एक

कायदा कोर्टाच्या मोठ्या इमारतीत, मेलव्हीन्स्कीच्या सुनावणीच्या वेळेच्या मध्यंतरात, सरकारी वकील, सभासद व इव्हान इगोरोव्हीच शेबेक त्याच्या खासगी खोलीत भेटले. तिथे क्रॅसोव्ह्स्कीच्या केसबद्दल संभाषण सुरु झाले. फेडोर वॅसिलेव्हीच सांगत राहीला, की तो त्यांच्या अधिकारातील कायद्याचा विषय नव्हता. पण इव्हान इगोरोव्हीच विरोध करत राहिला. तर पीटर इव्हानोवीच सुरवातीला संभाषणात भाग घेत नव्हता पण नुकतेच आलेले जर्नल बघत होता.

तो बोलला, "सभ्य गृहस्थहो, "इव्हान इलयीच मरण पावला."

"तू असे म्हणू नकोस."

पीटर इव्हानोवीचने फेडोर वॅसिलेव्हीचला छापखान्यातून नुकतेच आलेले ताजे जर्नल देत म्हटले, "हे बघ. तू स्वतःच वाच. काळया चौकटीत असे छापले होते, "प्रॅस्कोव्हया फेडोरोव्हना गोलोव्हीना दुःखाने मित्रांना व नातेवाईकांना असे जाहीर करत आहे, की तिचा प्रेमळ पती, न्याय देणाऱ्या कोर्टाचा सभासद,

इव्हान इलयीच गोलोव्हीन आज ४ फेब्रुवारी १९८२ रोजी मरण पावला. अंत्यविधी शुक्रवारी दुपारी एक वाजता होईल.”

इव्हान इलयीच तिथे जमलेल्या सभ्य गृहस्थांचा मित्र होता व सर्वांचा आवडता होता. बऱ्या न होणाऱ्या रोगाने तो गेले काही आठवडे आजारी होता. नोकरीतील त्याचे पद रिकामे ठेवण्यात आले होते, पण असे बोलले जात होते की त्याच्यानंतर ते पद अलेक्सीव्ह याला दिले जाईल. आणि अलेक्सीव्हनंतर ते विन्निकोव्ह किंवा श्टॅबेल यांना दिले जाईल.

अशा तऱ्हेने इव्हान इलयीचच्या मरणाची बातमी ऐकून, त्या खासगी खोलीतील प्रत्येकाच्या मनात हा विचार आला, की त्याना वा त्यांच्या ओोळखीच्यांना काही बदल होण्याची व बढती मिळण्याची ही संधी आहे.

फेडोर वॅसिलेव्हीचने विचार केला, ‘मला नक्कीच विन्निकोव्ह किंवा श्टॅबेलचे पद मिळेल. मला बऱ्याच काळापूर्वी तसे वचन दिले गेले होते. बढती म्हणजे मला वर्षाला आठशे रुबल्स जास्त आणि त्याशिवाय भत्ता!’

पीटर इव्हानोवीचने विचार केला, ‘आता मी काळूगाहून माझ्या मेहुण्याच्या बदलीसाठी अर्ज केला पाहिजे. माझी बायको

फार आनंदित होईल. मी तिच्या माहेरच्या माणसांसाठी काही करत नाही, असे ती यानंतर म्हणू शकणार नाही.’

पीटर इव्हानोवीच मोठ्याने म्हणाला, “मला वाटते आहे, की तो अंथरुणातून आता उठू शकणार नाही. हे फार वाईट आहे.”

“पण त्याला काय झाले होते?”

“डॉक्टर्स काही सांगू शकत नव्हते --- आणि प्रत्येकजण काहीतरी वेगळे सांगत होता. मी त्याला शेवटचे भेटलो, तेव्हा मला वाटले त्याची तब्येत सुधारते आहे.”

“मला सुट्टी लागल्यापासून त्याच्याकडे जायचे होते. पण मी जाऊ शकलो नाही.”

“त्याची काही मालमत्ता होती का?”

“मला वाटते, त्याच्या बायकोची काही होती --- पण अगदी क्षुल्लक!”

“तिला भेटायला जायला हवे. पण ते घर फार लांब आहे.”

“तुझ्या घरापासून! तुझ्या घरापासून सर्वच लांब आहे.”

शेबेककडे हसून बघत, पीटर इव्हानोवीच म्हणाला, “असे बघ, मी नदीपलीकडे रहात असल्याने त्याने मला कधीच माफ केले नाही.” मग शहराच्या विविध भागांतील अंतराबद्दल बोलत ते कोर्टात परतले.

इव्हान इलयीचच्या मरणामुळे, नेहमीचे जवळच्या ओळखीचा माणूस जाण्याचे विचार प्रत्येकाच्या मनात आलेच पण त्यामुळे होणारे बदल, बढत्या इत्यादीचा विचार करण्याशिवाय, ‘तो मेला आहे, मी नव्हे.’ असे समाधान प्रत्येकाला वाटले.

प्रत्येकालाच हे वाटले, की तो मेला पण मी जिवंत आहे. पण इव्हान इलयीचचे जवळचे नातेवाईक व [ तथाकथित ] मित्र, यांना असे वाटले, की आता त्यांना दफनविधीच्या दमवणाऱ्या प्रसंगाला हजेरी लावावी लागेल आणि विधवेला भेटून सांत्वन करावे लागेल.

फेडोर वॅसिलेव्हीच व पीटर इव्हानोवीच हे त्याचे जवळचे मित्र होते. पीटर इव्हानबरोबर कायदा शिकायला होता आणि स्वतःला त्याचा ऋणी समजत होता.

जेवायच्या वेळी त्याने बायकोला इव्हानच्या मरणाबद्दल सांगितले. तिच्या भावाला बढतीची संधी असल्याबद्दल सांगितले व संध्याकाळच्या झोपेवर पाणी सोडून, कपडे करून, तो इव्हानच्या घरी जाण्यासाठी निघाला.

त्याच्या घराच्या दारात एक मोठी गाडी व दोन लहान गाड्या उभ्या होत्या. खालील मजल्यावरील हॉलच्या भिंतीला लागून, सोनेरी वस्त्र अंथरून शवपेटीका ठेवली होती. धातूच्या चुऱ्याने पॉलिश केला दोरा व गोंडे त्याला बांधले होते. काळ्या कपड्यातील दोन स्त्रिया त्यांचे फरचे कोट काढून ठेवत होत्या. त्यापैकी एकीला पीटरने इव्हानची बहीण असल्याचे ओळखले, पण दुसरीला तो ओळखत नव्हता. त्याचा मित्र श्वाट्झ खाली येत होता. पण पीटरला पाहून, त्याने जसे काही असे सांगण्यासाठी डोळा मिचकावला, “इव्हान इलयीचने सर्व गोष्टींचा राडा करून ठेवला आहे --- तो तुझ्यामाझ्यासारखा नव्हे.”

श्वाट्झचा चेहरा, त्याच्या मिशा व संध्याकाळच्या कपड्यातील कृश आकृतीला नेहमीसारखा व्यवस्थिततपणाचा रुबाब होता. तो त्याच्या खेळकर स्वभावाला शोभत नव्हता. पण त्यामुळे तो उठून दिसत होता, असे पीटरला तरी वाटले.

पीटरने स्त्रियांना त्याच्यापुढे जाऊ दिले व स्वतः त्यांच्यामागून वर गेला.

श्वाट्झ खाली न येता, होता तिथेच राहिला. पीटरला समजले की की त्याला संध्याकाळी ब्रिज कुठे खेळायचे, हे ठरवायचे आहे. स्त्रिया वर विधवा बसलेल्या खोलीत गेल्या. श्वाट्झने गंभीरपणे ओठ आवळून, पण डोळ्यात खेळकरपणा आणून, भुवईला झटका देत, उजवीकडील प्रेत ठेवलेल्या खोलीकडे इशारा केला.

अशा प्रसंगी इतर प्रत्येकाप्रमाणे, पीटरने काय करायचे याची खात्री न वाटत प्रवेश केला. अशा वेळी छातीवर क्रॉस काढलेले बरे असते, हे त्याला माहिती होते. पण त्याला हे माहिती नव्हते, की असे करतांना प्रेताला वाकून मान द्यायचा की नाही. त्यामुळे त्याने मध्यम मार्ग स्वीकारला. खोलीत शिरल्यावर तो क्रॉस काढू लागला आणि थोडेसे वाकल्यासारखी हालचाल केली. त्याच वेळी त्याच्या डोक्याची व हातांचीही हालचाल केली आणि खोलीमध्ये नजर फिरवली. दोन तरुण मुले --- बहुधा पुतणे असावेत. त्यापैकी एक शाळेत जाणारा होता. ते खोली ओलांडून जात होते. जाता जाता छातीवर क्रॉस काढत होते. एक म्हातारी बाई स्थिर उभी होती. एक विचित्रपणे वक्राकार भुवया असलेली

बाई कुजबुजून तिच्याशी काही बोलत होती. कोट घातलेला, निश्चयाचा व उत्साही असा चर्चचा मनुष्य मोठ्या आवाजात विरोधाभासात्मक असे काही रोखून ठेवत, वाचत होता. स्वयंपाक्याचा मदतनीस गेरॅसीम पीटरसमोर हलकेच वाकून, जमिनीवर काही पसरत होता. हे लक्षात घेऊन, पीटरला ताबडतोब कुजत चाललेल्या शरीराचा मंदसा वास आला.

मागील वेळी पीटरने गेरॅसीमला अभ्यासिकेत पाहिल्यावर, इव्हान इलयीचला हाक मारली होती. गेरॅसीम आजारी दाईचे काम करत होता.

खोलीच्या कोपऱ्यातील टेबलावर असलेला ख्रिस्ताचा फोटो, शवपेटिका व वाचणारा माणूस, यांच्यामध्ये त्याचे डोके वळवत, पीटर क्रॉस काढत राहिला. नंतर त्याला जेव्हा असे वाटले, की क्रॉस काढताना त्याच्या हाताची फारच हालचाल होते आहे, तेव्हा तो थांबून प्रेताकडे बघू लागला.

मेलेला माणूस नेहमी पडतो, तसेच जडपणे प्रेत पडले होते. शवपेटिकेतील मऊ गादीवर, प्रेताचे निर्जीव हात पडले होते व डोके उशीवर कायमचे पडले होते. त्याच्या पिवळ्या मऊसर भुवया, आखडलेल्या कानशीलांवरील केस नसलेले भाग व वरच्या ओठावर दाबले गेल्यासारखे वाटणारे, बाहेर आलेले नाक

हे त्या प्रेताचे विशेष होते. पीटरने त्याला शेवटचे पाहिले, त्यापेक्षा तो खूप बदलला होता. बारीक झाला होता. पण सर्व मेलेल्या लोकांप्रमाणे त्याचा चेहरा चांगला दिसत होता. जिवंत असताना दिसत असे त्यापेक्षाही चांगला दिसत होता. गरजेचे असलेले सगळे चांगल्या मार्गांने मिळवल्याचे तो चेहरा बोलत होता. शिवाय त्या चेहऱ्यावर नापसंती व जगणाऱ्यांसाठी काही सूचना दिसत होती. पीटरला ती सूचना अस्थायी वाटली किंवा निदान ती त्याला उद्देशून नसावी असे वाटले. त्याला थोडे बेचैन वाटल्याने, त्याने घाईने परत क्रॉस काढला आणि त्याच्या लक्षात येण्याइतक्या घाईने, वागणुकीचे नियम तोडून, तो वळून दाराबाहेर पडला.

शेजारच्या खोलीत दोन्ही पायात भरपूर अंतर ठेऊन व पाठीमागे दोन्ही हातांनी त्याच्या डोक्यावरील टोपीशी खेळत, श्वाट्झ त्याच्यासाठी थांबला होता. त्या खेळकर, व्यवस्थित व डौलदार आकृतीला बघून, पीटर उल्हसित झाला. त्याला वाटले की हे जे काही घडले आहे, त्याच्या वर श्वाट्झ आहे. या उदासीचा त्याच्यावर काही परिणाम होत नाही. त्याची नुसती नजरच सांगत होती, ही इव्हानसाठी चाललेली चर्चची लगबग ऋतुबदल थांबवण्याचे पुरेसे कारण होऊ शकत नाही --- दुसऱ्या

शब्दात, हे त्याला नवीन पत्यांचा गठ्ठा उघडण्यापासून व ते पत्ते पिसण्यापासून, रोखू शकत नव्हते. तेव्हाच चर्चचा माणूस येऊन टेबलावर नवीन मेणबत्त्या लावून गेला. खरे तर असे समजायचे काही कारण नव्हते, की तो गंभीर प्रसंग असल्याने त्यांची संध्याकाळ त्यांच्या मनाप्रमाणे जाणार नाही. पीटर त्याच्या जवळून गेला, तेव्हा त्याने त्याला हे कुजबुजून सांगितले व असे सुचवले की त्यांनी खेळण्यासाठी फेडोर वॅसिलेव्हीचच्या घरी भेटावे. पण त्या संध्याकाळी पीटरच्या नशीबात ब्रिज खेळणे नव्हते. प्रॅस्कोव्हया फेडोरोव्हनाने [ किती प्रयत्न केले तरी ती बुटकी, जाड बाई तिचे खांदे सतत खालील बाजूस रुंद करत होती व तिच्या भुवया शवपेटीकेजवळ उभ्या असलेल्या बाईसारख्या विचित्रपणे धनुष्याकृती होत्या. ] तिने पूर्ण काळे कपडे घातले होते. डोके लेसने झाकले होते. ती इतर काही बायकांबरोबर तिच्या खोलीतून बाहेर आली व सगळ्यांना घेऊन, प्रेत ठेवलेल्या खोलीत गेली. ती म्हणाली, “चर्चचे लोक लवकरच क्रियाकर्म सुरु करतील. कृपया आत या.”

कसातरी वाकत श्चवाट्झ स्तब्ध उभा राहिला. त्याने त्या बाईचे म्हणणे मान्य केले नाही व तिची अवज्ञाही केली नाही. प्रॅस्कोव्हया फेडोरोव्हनाने पीटरला ओळखून, एक सुस्कारा

टाकला व त्याच्याजवळ गेली. त्याचा हात हातात घेऊन बोलली, “मला माहिती आहे तू इव्हान इलयीचचा खरा मित्र होतास --- “ त्याच्याकडून काही योग्य असे उत्तर मिळायची वाट बघत ती थांबली. पीटरला माहिती होते, की तिथे त्याने क्रॉस काढणे अपेक्षित होते. तेव्हा त्याने तिथे काय करायला हवे होते, की तिचा हात दाबून सुस्कारा टाकून असे म्हणायला हवे होते, की “माझ्यावर विश्वास ठेव --- “ तेव्हा त्याने असे सगळे केले आणि त्याला असे वाटले की त्यामुळे हवा तो परिणाम झाला. ती आणि तो दोघेही भावनामय झाले.

ती विधवा म्हणाली, “माझ्याबरोबर ये. हे सुरु होण्यापूर्वी मला तुझ्याशी बोलायचे आहे. मला तुझ्या हाताचा आधार दे.”

पीटरने तसे केले आणि ते आतल्या खोलीत गेले. ते श्वाट्झच्या अंगावरून गेले, तेव्हा श्वाट्झने पीटरकडे बघून दयेने डोळा मारला.

त्याच्या खेळकर दृष्टीने जणू असे सांगितले, “आपल्या ब्रिजसाठी ते चांगले आहे. अजून कोणी आपल्याला खेळण्यासाठी मिळत असेल, तर काही हरकत घेऊ नकोस. कदाचित तुझी सुटका होईल, तेव्हा तू पण खेळायला ये.”

पीटरने खोलवर उदासीचा सुस्कारा टाकला व प्रॅस्कोव्हया फेडोरोव्हनाने उतराई झाल्यासारखा त्याचा हात दाबला. जेव्हा ते गुलाबी फुलांचे पडदे लावलेल्या व मंदसा उजेड असलेल्या हॉलमध्ये आले, तेव्हा ते टेबलाशी बसले. ती सोफ्यावर व पीटर त्याच्या वजनाने झटका बसलेल्या एका कुशनच्या बुटक्या स्टुलावर बसला. प्रॅस्कोव्हया फेडोरोव्हना त्याला अशा स्टुलावर बसण्यापासून दूर रहायला सांगण्याच्या बेतात होती. पण आताच्या परिस्थितीत ते बरे दिसले नसते, हे जाणवून तिने तसे केले नाही. स्टुलावर बसल्यावर पीटरला आठवू लागले, की इव्हान इलयीचने कसा हॉल सजवला होता आणि कसे हिरवी पाने असलेले गुलाबी पडदे त्याच्या सल्ल्याने आणले होते. सगळा हॉल फर्निचरने व छोट्या छोट्या सुंदर गोष्टींनी सजला होता. सोफ्याकडे जातांना प्रॅस्कोव्हया फेडोरोव्हनाची काळी शाल टेबलाच्या कडेला अडकली. पीटर ती सोडवायला उठला आणि स्टुलाची स्प्रिंग त्याचे वजन उचलले गेल्याने वर आली व त्यामुळे तो वर ढकलला गेला. ती विधवा स्वतःची शाल सोडवू लागली व चुकार स्प्रिंग दाबली जाऊन, पीटर परत बसला. पण त्या विधवेला काही ते जमेना. मग पीटर परत उठला. परत स्प्रिंगने चुकारपणा केला व ती करकरली. हे सर्व झाल्यावर, तिने स्वच्छ रुमाल काढला व व ती शोक करू लागली. शालीचा प्रसंग व

स्टुलाच्या स्प्रिंगचा चुकारपणा आठवून, पीटरच्या भावना शांत झाल्या आणि तो तिथे चेहऱ्यावर उदासी घेऊन बसला. ही लाजीरवाणी परिस्थिती इव्हान इलयीचचा स्वयंपाकी सोकोलोव्ह, हा तिथे निरोप सांगण्यासाठी आल्याने बदलली. त्याने प्रॅस्कोव्हया फेडोरोव्हनाला सांगितले की तिने स्मशानात जी जागा निवडली होती, तिची किंमत दोनशे रुबल्स होती. तिने शोक करणे थांबवून, पीटरकडे बघून, फसवले गेल्याच्या भावनेने फ्रेंचमध्ये असे सांगितले की ही किंमत तिच्यासाठी फार जास्त आहे. पीटरने हावभाव करून असे दर्शवले की ते खरेच असावे.

तिने उदार तरीही चिरडलेल्या आवाजात म्हटले, "कृपया सिगरेट ओढ." मग सोकोलोव्हकडे वळून, ती स्मशानातील वेगवेगळया जागांसंबंधी चर्चा करू लागली.

पीटरने सिगरेट पेटवली व तिला फार सावधपणे निरनिराळ्या जागांसंबंधी चर्चा करताना व ती कुठली जागा घेणार, याविषयी बोलतांना ऐकले. ते झाल्यावर तिने गाणाऱ्या चर्चच्या लोकांना, त्याविषयी सूचना दिल्या. सोकोलोव्ह हॉलबाहेर गेला.

टेबलावर पडलेले अल्बम्स उचलत, तिने पीटरला सांगितले, "प्रत्येक गोष्टीकडे मीच जातीने लक्ष पुरवते." टेबलावर त्याच्या सिगरेटची राख पडलेली पाहून, तिने ताबडतोब त्याच्याकडे

ॲशपॉट सरकवला व बोलली, “माझ्या दुःखामुळे, मला व्यावहारिक गोष्टींकडे लक्ष देणे, जमत नाही पण हा माझा स्वभाव आहे. उलट, मी काही करू शकले, तर मी म्हणेन, माझे सांत्वन करू नका. पण माझे लक्ष वेधून घ्या. हे इव्हानशी संबंधित गोष्टींकडे लक्ष देणे आहे. तिने परत जणू रडण्याच्या तयारीसाठी तिचा रुमाल काढला. पण अचानक तिच्या भावना आवरत, तिने स्वतःला हलवून शांतपणे बोलायला सुरवात केली. “मला तुझ्याशी काही गोष्टींबद्दल बोलायचे आहे.”

पीटर वाकला. स्टुलाच्या कुशनमधील स्प्रिंग त्याच्याखाली लगेच उसळू लागली. तो ती सांभाळत राहिला.

“गेले काही दिवस त्याला फार त्रास होत होता.”

पीटर म्हणाला, “खरे का?”

“ओहो, फारच! तो सतत काही मिनिटे नव्हे, तर तासनतास किंचाळत असे. गेले तीन दिवस तर तो एकसारखा ओरडतो आहे. मला कळत नाही, मी ते कसे सहन केले. ते अशक्य होते. तीन खोल्यांच्या पलीकडेदेखील त्याचे ओरडणे ऐकू येत असे. ओहो, मला इतका त्रास झाला!”

पीटरने विचारले, “हा सर्व वेळ तो शुद्धीवर होता का?”

ती कुजबुजली, “हो. शेवटच्या क्षणापर्यंत. मरण्यापूर्वी पाऊण तास त्याने आपला निरोप घेतला आणि मरण पावला.

हा मनुष्याच्या यातनांचा विचार त्याला अगदी जवळून परिचित होता. पहिल्यांदा एक आनंदी मुलगा म्हणून, मग वर्गमित्र म्हणून व मग मोठा झालेला मित्र म्हणून, तो त्याला ओळखत होता. अचानक पीटर भीतीने शहारला. त्याच्या नकोशा सद्सदविवेकबुद्धीचा व त्या बाईच्या विचार लपवण्याचा त्याच्यावर काही परिणाम झाला नाही. त्याने परत ती भुवई व ओठ दाबणारे नाक पाहिले व त्याला स्वतःसाठी भीती वाटली.

त्याने क्षणभर विचार केला व त्याला भीतीदायक वाटले. “तीन दिवस भयंकर त्रास आणि मग मृत्यू! हे अचानक, कधीही माझ्या बाबतीतही होऊ शकते. पण --- त्याला स्वतःला माहिती नव्हते, की कसे --- सहजच त्याला जाणवले, की हे त्याच्या बाबतीत नव्हे तर इव्हान इलयीचच्या बाबतीत झालेले आहे. हे त्याला होणे शक्य नव्हते व तशी कल्पना करणे हे स्वतःला उदास करणे होते. तसे करणे योग्य नव्हते, असे श्वाट्झचे हावभाव सरळसरळ दर्शवत होते. त्यानंतर पीटरला धीर आला व तो रुची घेऊन इव्हानच्या मरणाविषयीचा साद्यंत वृत्तांत विचारू लागला,

जसे काही त्याच्या स्वतःच्या बाबतीत नाही, तरी इव्हानच्या बाबतीत मरण हे नैसर्गिक अपघाताने आले होते.

इव्हानने भोगलेल्या भयानक शारीरिक यातनांच्याबद्दल ऐकून, [ त्यामुळे प्रॅस्कोव्हया फेडोरोव्हनाला जो त्रास झाला त्याचा साद्यंत वृत्तांत तिच्याकडून ऐकून, ] त्या विधवेला कामाला लागण्याचे कारण स्पष्टपणे लक्षात आले.

ती म्हणाली, “ओहो! पीटर, हे खूप कठीण होते. भयानक रीत्या कठीण होते.” एवढे बोलून ती परत शोक करू लागली.

पीटरने सुस्कारा टाकला व तिचे नाक गळणे संपायची वाट बघू लागला. त्यानंतर तो म्हणाला, “माझ्यावर विश्वास ठेव --- “ ती परत बोलू लागली व तिचे त्याच्याकडे काय मुख्य काम होते, ते सांगू लागली. ते असे होते, की तिने सरकारकडून तिच्या नवऱ्याच्या मरणाबद्दल पैशांचे अनुदान कसे मिळवावे. तिने असे भासवले की ती पीटरला तिच्या पेन्शनसंबंधी काही सल्ला विचारत आहे. पण त्याच्या लगेचच लक्षात आले, की त्याच्यापेक्षा तिला त्यातील अगदी बारीसारीक बाबीदेखील माहिती आहेत. पण तिला फक्त एवढी खात्री करून घ्यायची होती, की तिला माहिती नसलेल्या काही गोष्टी त्याला माहिती आहेत का. पीटरने तसे आठवायचा प्रयत्न केला. पण थोडा वेळ

विचार करून व नीतीतत्वांना धरून, सरकारच्या कंजूषपणाबद्दल दोष देत, तो म्हणाला, त्याला वाटते, की अजून जास्त काही मिळणार नाही. मग तिने सुस्कारा टाकून, तिच्या भेटीला येणाऱ्या पाहुण्यांना टाळायचा मार्ग शोधून काढायला सुरवात केली. हे बघून, त्याने त्याची सिगारेट विझवली. तो उठला, तिचा हात दाबला आणि दुपारच्या उन्हात बाहेर पडला.

इव्हानने जुन्या मूल्यवान वस्तूंच्या दुकानातून आणलेले, खूप आवडते घड्याळ असलेल्या जेवायच्या खोलीत, पीटरला काही ओळखीची माणसे व धर्मगुरू भेटले. ते सर्वजण इव्हानच्या उत्तरक्रियेसाठी आले होते. त्याने इव्हानच्या मुलीला ओळखले. ती एक सुंदर तरुणी होती. काळ्या कपड्यात ती पूर्वीपेक्षाही जास्त बारीक वाटली. तिचे हावभाव मंद, जवळजवळ रागीट, व निश्चयाचे दिसत होते. ती पीटरला बघून वाकली जसे काही पीटरचा काही दोष होता. तिच्यामागे तसेच उदास भाव घेऊन एक श्रीमंत तरुण मनुष्य उभा होता. तो तिचा वाग्दत्त वर असल्याचे त्याने ऐकले होते. तो तपासणी करणारा दंडाधिकारी होता. त्याला पीटर ओळखत होता. तो शोकप्रदर्शन करत, त्यांच्यापुढे किंचित वाकला व प्रेत ठेवलेल्या खोलीत जायला निघाला. तेव्हा अगदी हुबेहूब इव्हानसारखा चेहरा असलेला त्याचा शाळेत जाणारा

मुलगा, जिन्याच्या खालून एकदम अवतीर्ण झाला. पीटरला तरुण इव्हानची आठवण आली, जेव्हा ते एकत्र कायद्याचा अभ्यास करत होते. त्या मुलाच्या अश्रुभरल्या डोळयांमध्ये तेरा चौदा वर्षाच्या मुलाचे भाव दिसत होते. जेव्हा त्याने पीटरला पाहिले, तेव्हा त्याने खचलेल्या मनाने, रागीट व लाजलावणा चेहरा केला. पीटरने त्याच्याकडे बघून मान हलवली व प्रेत असलेल्या हॉलमध्ये शिरला. चर्चचे विधी सुरु झाले. मेणबत्त्या, वेगवेगळे आवाज, उदबत्त्या, अश्रु व हुंदके तिथे उमटले. पीटर मंदपणे त्याच्या पायांकडे, खाली नजर लावून उभा राहिला. त्याने एकदाही मृत मनुष्याकडे पाहिले नाही. काही उदास करणाऱ्या बाबींकडे त्याने लक्ष दिले नाही. हॉल सोडून बाहेर पडलेला, तो पहिला मनुष्य होता. , लोक थांबलेल्या खोलीत आता कुणी नव्हते. पण गेरॅसीम प्रेत ठेवलेल्या खोलीतून बाहेर पडला व त्याच्या बळकट हातांनी फरकोट बाजूला करत, चुकतमाकत पीटरला शोधून काढले. त्यालाही बाहेर पडायला मदत केली.

काहीतरी बोलायचे म्हणून पीटर म्हणाला, “मित्रा गेरॅसीम, कसे काय? फार दुःखद घटना आहे, नाही का?”

त्याचे सुदृढ शेतकऱ्याचे पांढरे दात दाखवत गेरॅसीम बोलला, “ही देवाची इच्छा आहे. आपल्या सर्वांना एक ना एक दिवस त्या

वाटेने जायचेच आहे. नंतर तातडीचे काम करण्याच्या घाईगर्दीत असलेल्या गेरॅसीमने, चटकन पुढचे दार उघडून गाडीवाल्याला बोलावले. पीटरला त्यात बसायला मदत करत, परत पुढचे काम करायला तयार असल्यासारखा घरापुढील भागात आला

गाडीत बसल्यावर पीटरला प्रेताचा, उदबत्तीचा इत्यादी वासांपासून सुटका होऊन, ताजी हवा मिळाली. टांगेवाल्याने विचारले, “सर, कुठे जायचे आहे?

“अजून फार उशीर झालेला नाही. मी फेडोर वॅसिलेव्हीचकडे जातो.”

टांगेवाल्याने त्याला तिकडे नेले. तिथे त्यांचा पहिला डाव नुकताच संपला होता. त्यामुळे तो योग्य वेळी आला होता.

# दोन

इव्हान इलयीचचे आयुष्य फार साधे व सामान्य आणि त्यामुळे फार भयंकर होते.

तो कायद्याच्या कोर्टाचा सभासद होता. पंचेचाळीस वयाला तो वारला. त्याच्या वडिलांनी पिट्सबर्गमध्ये वेगवेगळ्या सरकारी खात्यांमध्ये बरीच वर्षे काम केल्यावर, जरी ते जबाबदारीचे पद सांभाळण्यास लायक नसले, तरी त्याना नोकरीवरून काढता येणार नाही, अशी स्वतःची स्थिती निर्माण केली होती. अशा लोकांसाठी मुद्दाम काही पदे निर्माण करण्यात आली होती. त्यांचा पगार सहा ते दहा हजार रुबल्सपर्यंत असे. हे खोटे नसे व त्यामुळे हे लोक खूप वर्षे जगत.

असा इलया एपिमोव्हीच गोलोव्हीन हा गुप्त सल्लागार व गरज नसलेल्या संस्थेचा गरज नसलेला सभासद होता.

त्याला तीन मुलगे होते. त्यातील इव्हान इलयीच हा दुसरा होता. पहिला मुलगा वडिलांसारखाच पण दुसऱ्या विभागात होता. त्याने नोकरीमध्ये आधीच ती वेळ गाठली होती ज्यात काम फारसे नसे, पण पगार तर मिळत असे. तिसरा मुलगा काही कामाचा नव्हता. त्याने अनेक नोकऱ्या करून पाहिल्या. तो

रेल्वेमध्ये काम करत नव्हता. त्याने त्याचे भविष्य नासवून टाकले होते. त्याचे वडील व भाऊ आणि जास्त करून त्यांच्या बायकांना त्याला भेटायला आवडत तर नसेच पण अगदी अनिवार्य झाल्याशिवाय, त्याचे आस्तित्वदेखील त्या नाकारायच्या. त्याच्या बहिणीने तिच्या वडिलांसारख्या ऑफीसमध्ये काम करणाऱ्या पिट्सबर्गमधील बॅरॉन ग्रेफशी लग्न केले होते. लोक इव्हान इलयीचला ‘ले फेनिक्स डी ला फॅमिले’, म्हणजे तीन भावातील सर्वात हुशार म्हणत असत. तो त्याच्या मोठ्या भावाप्रमाणे, थंड व जेवढ्यास तेवढ्या स्वभावाचा नव्हता. तो लहान भावाप्रमाणे, रानटीदेखील नव्हता. तो दोघांच्यामधील आनंदी प्राणी होता --- हुशार, चटपटीत व उत्साही होता. त्याने धाकट्या भावाबरोबर कायद्याचे शिक्षण घेतले होते. पण धाकटा भाऊ ते शिक्षण पूर्ण करू शकला नाही आणि पाचव्या वर्गात असतांना त्याला तेथून काढून टाकण्यात आले होते. इव्हानने ते शिक्षण चांगल्या प्रकारे पूर्ण केले. इतर आयुष्यात इव्हान जसा होता, तसाच कायद्याच्या शिक्षणातही आनंदी, लायक, चांगल्या स्वभावाचा व समाजात मिळून मिसळून रहाणारा प्राणी होता. तरही तो त्याच्या कर्तव्यपूर्तीच्या बाबतीत कडक होता. त्याच्या वरिष्ठांना कर्तव्याची जशी जाण होती, तशीच त्यालाही होती. मुलगा म्हणून किंवा मोठा माणूस म्हणून तो कधीही आज्ञाधारक

नव्हता. जसा कीटक उजेडाकडे आकर्षित होतो, तसा तो तरुण असल्यापासून, वरीष्ठांकडे ओढला गेलेला असे. त्यांच्या पद्धती व जीवनविषयक दृष्टीकोन तो आत्मसात करे. त्यांच्याशी मैत्रीचे नाते प्रस्थापित करे. बालपण व तारुण्य त्याच्यावर फारसा परिणाम न होता गेले. आनंदित रहाण्यात, गर्व न बाळगण्यात, उच्चवर्गीयांमध्ये उदारमतवादाचा योग्य तेवढा पुरस्कार करण्यात त्याचे आयुष्य घालवणे, त्याला बरोबर वाटले.

शिकतांना काही गोष्टी त्याला आधी नकोशा वाटत. त्या करायचा त्याला तिरस्कार वाटे. पण उच्च पदावरील व्यक्तींना त्या करतांना पाहून व त्या त्यांना चुकीच्या वाटत नसल्याचे पाहून, त्याला त्या गोष्टी जरी पूर्णपणे योग्य वाटल्या नाहीत, तरी त्या गोष्टी विसरून जाणे किंवा त्यांचा त्रास करून न घेणे हे त्याला जमू लागले.

कायद्यातील पदवी मिळवल्यावर, सिव्हील सर्व्हिस परीक्षेत दहावा क्रमांक मिळवल्यावर आणि वडिलांकडून तयारीसाठी पैसे मिळाल्यावर, इव्हान इलयीचने एका फॅशनेबल शिंप्याकडून, कपडे शिवून घेतले. त्याच्या घड्याळाच्या चेनमध्ये अडकवायला, त्याच्या मरणानंतरही तो नावाजला जाईल, असा मोठ्या लोलकासारखा पदकाचा दागिना बनवून घेतला. त्याच्या

कॉलेजच्या मुख्याध्यापकांचा व संस्थापक राजकुमाराचा निरोप घेऊन सर्वांना, छानशा ठिकाणी नवीन कपडे घालून, निरोपाचे जेवण दिले. उत्तम कपडे, दाढीचे सामान, प्रवासी रग, इत्यादीची चांगल्यापैकी दुकानातून खरेदी करून, त्याच्या वडिलांच्या ओळखीने गव्हर्नरच्या विशेष सेवेतील पदासाठी मुलाखत द्यायला तो निघाला.

त्या नोकरीत इव्हानने लवकरच जम बसवला. त्याने ऑफिसच्या कामात चुणूक दाखवली व त्याचे करीयर घडवले. त्याच वेळी आल्हादकपणे व रुचीसंपन्नतेने स्वतःचे मनोरंजनही केले. काही वेळा तो राज्यातील जिल्ह्यांना कामानिमित्त भेट देई. तिथे तो डौलदारपणे त्याच्या वरीष्ठांशी व कनिष्ठांशी वागे. त्याच्यावर सोपवलेले कर्तव्य पार पाडे. विभागांचे नेमके काम, लाचलुचपत न घेता, प्रामाणिकपणे करे व त्याबद्दल त्याला अभिमान वाटे.

गंभीर नसलेल्या आनंदासाठीची त्याची अभिरुची आणि त्याचे उमलणारे तारुण्य असले, तरी ऑफिसच्या कामांच्या बाबतीत, तो खूपच काटेकोर व कडक होता. पण समाजात वावरतांना, तो करमणूक करणारा, शहाणा, चांगल्या स्वभावाचा, योग्य पद्धत असलेला व गव्हर्नर आणि त्याच्या बायकोसाठी

लहान बाळासारखा होता. तो जणू गव्हर्नरच्याच कुटुंबातील असल्यासारखे बोलले जात होते.

त्या राज्यात त्याचे एका बाईशी प्रकरण चालले होते. तीदेखील या तरुण वकिलाला उत्तेजन देत होती. तिथे लखपतीही होते. बिअर वगैरे पेये असलेली मेजवानी होती. जिल्ह्यांना व संशयपूर्ण कीर्ती असलेल्या रस्त्याला भेट देणाऱ्या उच्चपदस्थ अधिकाऱ्यांसाठी खासगी मदतनीसही होते. त्यांना तर इतकी सुविधा होती, की त्याच्या बायकोलाही या सुखसोयी पुरवल्या जात. पण हे सर्व अत्यंत साधेपणाने व नेमकेपणाने केले जात असे, की काही नावे ठेवायला जागा उरत नसे. ‘तरुणांनी त्यांच्या वयाला साजेशी मौजमस्ती करावी व म्हाताऱ्यांनी ती सहन करावी.’ या फ्रेंच म्हणीप्रमाणे, ते सर्व काही चाले. हे स्वच्छ हातांनी, स्वच्छ वातावरणात चाले. समाजातील अभिजन मंडळींमध्ये व त्यांच्या पसंतीने चाले.

अशी पाच वर्षे इव्हानने नोकरी केली. मग त्याच्या आयुष्यात बदल झाला. नवीन सुधारित कायदेशीर बाबी अस्तित्वात आल्या आणि नवीन माणसांची जरुरी भासू लागली. इव्हान तसा नवीन मनुष्य बनला. त्याला परीक्षण करणाऱ्या दंडाधिकाऱ्याचे पद बहाल करण्यात आले. जरी ते दुसऱ्या राज्यात असले, तरी त्याने

ते स्वीकारले. त्याला इथे जोडलेली माणसे सोडावी लागली व नवीन माणसे जोडावी लागली. त्याच्या मित्रांनी जमून त्याला निरोप दिला. त्यांच्या गटाचा फोटो घेतला गेला. त्याला चांदीची सिगरेट केस दिली गेली आणि तो नव्या कामगिरीवर निघाला. परीक्षण दंडाधिकारी इव्हानच्या वागण्याच्या पद्धती सुयोग्य होत्या आणि तो चांगली रुची असलेला व नम्र होता. तो सहजपणे दुसऱ्यांना मान देई. त्याच्या खासगी आयुष्यापासून तो त्याचे हे नवीन विशेष प्रकारचे काम वेगळे काढू शके. त्याचे हे परीक्षण दंडाधिकाऱ्याचे रुचीपूर्ण व आकर्षक काम आधीच्या कामापेक्षा त्याला खूप आवडले. आधीच्या नोकरीत, तो आनंदाने गणवेष घालत असे व अर्जदारांच्या गर्दीतून जात असे. मात्र आता तो गव्हर्नरबरोबर त्याच्या खासगी खोलीत बसून, चहा घेई व सिगरेट ओढे. बाहेरील लोक त्याचा हेवा करत. पण लोक त्याच्यावर सरळसरळ अवलंबून नसत. मध्ये बरेच इतर काम करणारे असत. जेव्हा तो एखाद्या वेगळ्या कामगिरीवर जाई, तेव्हा पोलीस अधिकारी व त्या विभागातील लोकांशी त्याचा संबंध येई. तो त्यांच्याशी नम्रपणे व मित्रासारखे वागे. खरे तर त्याच्यामध्ये त्याना चिरडण्याची क्षमता व अधिकार असे. पण तो साधेपणाने वागत असे. असे त्याच्यासारखे लोक फार नव्हते. परीक्षण अधिकारी म्हणून इव्हान इलयीचला वाटले, अगदी महत्वाचे

आणि स्वतः समाधानी असलेले लोकसुद्धा त्याच्या जरबेत असत. त्याने एका कागदावर नुसते ठराविक मथळ्याखाली काही शब्द खरडले की अगदी महत्वाचे आणि स्वतः समाधानी असलेल्या लोकानासुद्धा साक्षीदार किंवा गुन्हेगार म्हणून त्याच्या समोर यावे लागे आणि त्याने बसायला सांगितले नाही तर उभेच रहावे लागे व प्रश्नांची उत्तरे द्यावी लागत. पण इव्हान इलयीच कधीच त्याच्या हातातील सत्तेचा गैरवापर करत नसे. उलट तो मवाळपणे बोले. त्याचे तसे प्रयत्न व सद्सदविवेकबुद्धी यामुळे तो त्याच्या कार्यालयात सगळ्यांचा आवडता होता व आकर्षणाचा केंद्रबिंदू होता. त्याच्या तपासणीच्या कामात, तो केसमधील कायदेशीर नसलेल्या बाबी वगळायला लवकरच शिकला. अतिशय गुंतागुंतीची केसही तो स्वतःचे खासगी मत पूर्णपणे वगळून कागदावर मांडू शके. शिवाय सगळ्या सोपस्कारांचे बंधन पाळून तो हे करू शके. इव्हान इलयीच हा १८६४ चे नवीन कोड वापरणाऱ्या पहिल्या काही लोकांपैकी होता.

नवीन गावात परीक्षण दंडाधिकारी म्हणून, काम स्वीकारल्यावर, त्याने नवीन ओळखी करून घेतल्या. नवीन संबंध प्रस्थापित करून बस्तान बसवले व नवीन पद्धत अंगिकारली. त्याने राजपत्रित अधिकाऱ्यांशी रुबाबदारपणे थोडे

अलिप्त धोरण स्वीकारले. पण कायद्याचे ज्ञान असलेल्या सभ्य लोकांचा एक चांगला गट जमवला. गावात रहाणाऱ्या अभिजन श्रीमंत लोकांचा गट जमवून, सरकारविरुद्धचा काहीसा असमाधानाचा व मवाळ उदारमतवादाचा व शहाण्या नागरिकाचा दृष्टीकोन स्वीकारला. त्याशिवाय त्याच्या पोषाखाच्या व वागायच्या पद्धतीतील डौल मात्र तसाच ठेवला. त्याने त्याला आवडेल इतपत दाढी वाढवायला सुरवात केली.

इव्हान इलयीच या नवीन गावात छानपैकी प्रस्थापित झाला. तेथील जनतेचा दृष्टीकोन थोडा सरकारविरुद्ध होता. पण गव्हर्नरशी त्यांचे संबंध सलोख्याचे होते. त्याच्या पगाराची रक्कम मोठी होती. तो ब्रिजचा एक प्रकार खेळू लागला. त्यामुळे त्याच्या आयुष्यातील आनंद थोडा वाढला, कारण तो पत्ते चांगल्या विनोदबुद्धीने खेळे. आकडेमोड जलद व योग्य तऱ्हेने करे व सहसा जिंकत असे.

तिथे दोन वर्षे राहिल्यावर त्याला त्याची होणारी बायको भेटली. तो फिरत असे, त्या भागातील प्रॅस्कोव्हया फेडोरोव्हना मिखेल ही खूप आकर्षक, हुशार आणि बुद्धिमान मुलगी होती. परीक्षण दंडाधिकाऱ्याच्या कष्टदायक कामातून, थोडी मोकळीक

व करमणूक मिळवण्यासाठी त्याने तिच्याशी खेळकर हलकेसे संबंध प्रस्थापित केले.

जेव्हा त्याला काही विशेष सेवेचे काम असे, तेव्हा तो नृत्य करत असे. पण आता परीक्षण दंडाधिकारी म्हणून काम करतांना असे करणे तेवढे सर्वसामान्य नव्हते. तो आता सुधारित नियमांनुसार काम करत असे, आणि तो पाचव्या ऑफीसरच्या जागेपर्यंत पोचला असला, तरी नाचायची वेळ आली, की तो ते इतरांपेक्षा चांगला नाचत असे. त्यामुळे कधीकधी संध्याकाळी तो प्रॅस्कोव्हया फेडोरोव्हना मिखेलबरोबर नाचत असे. मुख्यतः या नाचांमधून त्याने तिला जिंकले. ती त्याच्या प्रेमात पडली. पहिल्यांदा इव्हान इलयीचचा लग्न करायचा विचार नव्हता पण ती मुलगी त्याच्या प्रेमात पडल्यावर, त्याने स्वतःशी विचार केला. ‘खरेच, हिच्याशी लग्न का करू नये?’

प्रॅस्कोव्हया फेडोरोव्हना चांगल्या घराण्यातील होती. दिसायला वाईट नव्हती. थोडी संपत्तीही तिच्या नावे होती. इव्हान इलयीचने जास्त बुद्धिमान मुलीची इच्छा केली असती. पण ही देखील ठीक होती. त्याला त्याचा पगार होता आणि तिलाही जवळजवळ तेवढेच उत्पन्न होते. ती गोड, आल्हादक आणि पूर्णपणे योग्य अशी, बरेच नातेवाईक असलेली मुलगी होती.

इव्हानदेखील तिच्या प्रेमात पडला होता. त्याचा जीवन विषयक दृष्टीकोनसुद्धा तिला पटत होता. त्याच्या मित्रमंडळींनी तिला पसंत केले, म्हणून ते लग्न झाले. लग्नामुळे त्याचे व्यक्तिगत समाधान झाले. त्याच्या उच्चपदस्थ अधिकाऱ्यांनीदेखील ती गोष्ट योग्य असल्याचे मत दिले.

तर अशा तऱ्हेने इव्हानने लग्न केले.

लग्नाची तयारी व विवाहीत आयुष्याची सुरवात एकमेकांना हळूवारपणे खुलवण्याने, नवीन फर्निचरने, नवीन काचसामानाने व नवीन कापडचोपडाने झाली. त्याची बायको गर्भवती होईपर्यंत या सर्वांचे नावीन्य टिकून राहिले --- इव्हानला असे वाटू लागले, की लग्न सहजतेने, समजुतीने, आनंदाने, समाजमान्य रीतीने व चांगल्या नैसर्गिक तऱ्हेने नुसते आयुष्यभर चालू न रहाता उलट अधिक दर्जा प्राप्त करेल. पण त्याच्या बायकोच्या गरोदरणाच्या पहिल्या महिन्यापासून, काहीतरी नकोसे, उदास करणारे, अनपेक्षित आणि त्यापासून सुटका नसलेले असे काही घडू लागले.

काही कारणाशिवाय त्याची बायको जिवंतपणाचा व आनंदाचा अनुभव करू लागली, असे इव्हानने स्वतःला समजावले --- पण त्यामुळे त्यांच्या जीवनाची सुखसुबत्ता ढवळून

निघू लागली. काही कारणाशिवाय ती त्याचा हेवा करू लागली. तो आपल्याकडे पूर्ण लक्ष देत नाही, असे तिला वाटू लागले. ज्यात त्यात ती त्याच्या चुका काढू लागली. उद्धट व वाईट पद्धतीने वागून तमाशा करू लागली. पहिल्यांदा इव्हान सोप्या व दर्जेदार पद्धतीने अशा अप्रिय गोष्टींपासून पळ काढायला बघू लागला. त्याच्या बायकोच्या मान्य न होण्यासारख्या मनस्थितीकडे, दुर्लक्ष करू लागला. तो त्याच्या नेहमीच्या आनंददायी व आल्हादक पद्धतीने जगू लागला. पत्ते खेळायला मित्रांना घरी आमंत्रित करू लागला. बाहेर क्लबमध्ये जाऊ लागला किंवा मित्रांबरोबर संध्याकाळचा वेळ घालवू लागला. पण एक दिवस त्याची बायको त्याच्या चुका दाखवून, त्याच्या अंगावर इतक्या उद्धट रीतीने ओरडू लागली. तिच्या मागण्या पूर्ण न केल्यास दर वेळी त्याला हेकटपणे व अगदी ठरवून, ती त्याला तो शरण येईपर्यंत शिव्या देऊ लागली. तो घरी बसला की तिचे समाधान होई. पण मग तो व ती दोघेही कंटाळून जात --- यामुळे तो फार वैतागून गेला. प्रॅस्कोव्हया फेडोरोव्हनाबरोबरच्या विवाहित जीवनातील त्रास तो समजून चुकला. जीवनातील आनंद व सुखसोयी घेण्यासारखी परिस्थिती ती ठेवत नसे. समाजमान्य पद्धत व आरामशीरपणा हे दोन्ही ती उलट अमान्य करे. मग तो त्याविरुद्ध आवाज उठवे. असे करण्याची संधी तो

शोधू लागला. त्याच्या कार्यालयाच्या कामांचा प्रॅस्कोव्हया दुस्वास करू लागली आणि त्या कामाच्या कारणाने तो बायकोपासून लांब रहाण्याचे स्वातंत्र्य मिळवू लागला.

त्यांच्या मुलाच्या जन्माबरोबर, त्याला दूध पाजायचे व ते न जमण्याचे अनेक प्रयत्न त्याने केले. इव्हानच्या सहानुभूतीची मागणी करणारी बाळाच्या आईची आणि बाळाची खरी व काल्पनिक आजारपणे! पण त्याला ते न कळणे! कुटुंबापासून व कौटुंबिक आयुष्यापासून दूर स्वतःला सुरक्षित ठेवणे, हे त्याच्या दृष्टीने अजूनच महत्वाचे होऊन बसले.

जशी बायको जास्त चिडचिड करू लागली व जास्त मागण्या करू लागली, तसे इव्हानने त्याच्या जीवनाचा गुरुत्वमध्य त्याच्या कार्यालयीन कामाकडे वळवला. त्याच्या कामात प्रगती होऊन ते त्याला जास्त आवडू लागले. त्यामुळे तो अधिक महत्वाकांक्षी बनला.

लवकरच लग्नानंतर एका वर्षाने, इव्हानच्या लक्षात आले की जरी लग्नामुळे आयुष्यात काही आराम मिळत असला, तरी खरे तर ते एक गुंतागुंतीचे व अवघड प्रकरण आहे. एखाद्याला स्वतःचे कर्तव्य बजावतांना, म्हणजे समाजमान्य असे सुबक

आयुष्य जगतांना, प्रत्येकाने व्यावसायिक कामाच्या बाबतीत असतो, तसा विशिष्ट दृष्टीकोन अंगी बाणवणे जरुरीचे असते.

विवाहित आयुष्याबद्दल इव्हानचा दृष्टीकोन असा तयार झाला. त्याला त्यापासून फक्त सोयी हव्या होत्या --- घरचे जेवण, घरी असलेली बायको आणि अंथरूण आणि सर्वात महत्वाचे म्हणजे, समाजमान्य असलेली वरवरची नीतीमत्ता! बाकी सर्व गोष्टींकडे तो हलकासा आनंद व नैतिकता म्हणून बघे आणि ते जेव्हा साध्य होई, तेव्हा तो आभार माने. पण जर त्याला विरोध झाला किंवा तक्रारखोरपणाचा अनुभव आला, तर तो लगेच त्याला समाधान देणाऱ्या त्याच्या कामाच्या वेगळया जगात जाई.

कार्यालयात इव्हान मोठा मान असलेला होता आणि तीन वर्षाने तो अजून वरच्या पदाला चढला. त्याची नवीन कर्तव्ये, त्याचे महत्व, कुणालाही तुरुंगात पाठवण्याचे त्याचे अधिकार, त्याच्या भाषणांना होणारी गर्दी आणि सर्वच बाबतीतील त्याचे यश, यामुळे त्याचे काम अधिकाधिक आकर्षक होई.

अजून मुले झाली. त्याची बायको अधिकच तक्रारखोर व चिडचिडी झाली. पण इव्हानचा घरच्या बाबतीतील दृष्टीकोन तिच्या आरड्या ओरड्याकडे दुर्लक्ष करण्याचा झाला.

सात वर्षांनी, त्याची दुसऱ्या गावाला बदली झाली. ते हलले. पण पैसा कमी पडू लागला. त्याच्या बायकोला हे नवीन गाव आवडेना. पगार वाढला होता, तरी रोजचे खर्च वाढले होते. शिवाय त्याची दोन मुले मेली. त्याचे कौटुंबिक आयुष्य त्याच्यासाठी अजून दुःखदायी ठरले.

नवीन घरातील गैरसोयींबद्दल प्रॅस्कोव्हया तिच्या नवऱ्याला दोष देई. मुलांच्या शिक्षणाबद्दल नवराबायकोतील संभाषण आधीची भांडणे उकरून काढे व केव्हाही भडका उडे. त्यांच्यामध्ये कामजीवनातील काही सुखाचे क्षण येत. पण ते फार टिकत नसत. ते किनाऱ्यास लागत, अशी ही न टिकणारी तात्पुरती बेटे असत. लवकरच ती सागरात विरून दोघांचे शत्रुत्व व तुटकपणा सुरु होई. हा तुटकपणा खरे तर असू नये, असे इव्हानला वाटायला हवे होते. पण आता तो तशी स्थिती सर्वसामान्य असल्याचे समजू लागला होता. आपले कौटुंबिक आयुष्य आता असेच असणार, हे तो समजून चालला होता. या कटकटीपासून सुटका होण्याचा, तो जास्तीत जास्त प्रयत्न करे. वरवर त्यांच्याशी समाजमान्य पद्धतीने वागे. कुटुंबांबरोबर तो कमीतकमी वेळ घालवे. जेव्हा घरी रहाणे अपरिहार्य होई, तेव्हा तो पाहुण्यांना बोलावून, त्याचे स्थान बळकट करे. पण मुख्य गोष्ट

अशी होती, की त्याला कार्यालयात काम असे. त्याच्या आयुष्यातील सगळी रुची आता त्याच्या कामाच्या बाबतीत एकवटली होती. त्याच्या हातातील अधिकाराचा वापर करून, तो कोणालाही गाळात घालू शकत असे किंवा त्याचे महत्व कमी करू शकत असे. त्याचा कोर्टात शिरण्याचा रुबाब, त्याच्या कनिष्ठांशी किंवा वरीष्ठांशी त्याचे भेटणे, त्यातील त्याचे यश आणि सर्वात वरकडी म्हणजे त्याचे केस हाताळण्याचे कौशल्य! आणि ते त्याला माहिती होते. हे सर्व आणि मित्रांशी गप्पा, जेवणे व ब्रिज त्याला आनंद देई व त्याचे आयुष्य सुखाने भरून जाई. अशा तऱ्हेने त्याला हवे तसे त्याचे आयुष्य चालले होते.

अशा तऱ्हेने सात वर्षे चालले. त्याची मोठी मुलगी सोळा वर्षांची झाली. अजून एक शाळेत जाणारा, वादाचा विषय असलेला मुलगा होता. इव्हानला त्याला कायद्याचे शिक्षण द्यायचे होते. पण नवऱ्याला दुखावण्यासाठी प्रॅस्कोव्हयाने त्याला वेगळ्याच ठिकाणी पाठवले. मुलीला घरीच शिक्षण देऊन, चांगली गृहिणी बनवले. मुलगाही फार काही वाईट शिकला नाही.

# तीन

अशा तऱ्हेने इव्हान त्याच्या लग्नानंतर सतरा वर्षे जगला. तो आधीच हुशार वकील म्हणून प्रसिद्ध होता. त्याने बाहेर कुठे बदली नाकारून बढतीकडे पाठ फिरवली होती. तेव्हा एका दुर्दैवी व अचानक चालून आलेल्या घटनेने त्याच्या शांत आयुष्यात त्याच्यावर उदासी पसरली. एका विद्यापीठ असलेल्या शहरात इव्हान अजून बढतीची जागा मिळण्याची अपेक्षा करत असतांना, त्याला नशीबाने ती खरोखर मिळाली. त्याला ती नको असतांना मिळाल्याने, इव्हान चिडला व नशीबाला कोसू लागला. त्याच्या वर असलेल्या ऑफिसर लोकांशी भांडू लागला. त्यांनी थंडपणे इव्हानला परत जिथे नवीन नेमणुका चालू होत्या, तिथे पाठवून दिले.

ते १८८० साल होते. इव्हानच्या आयुष्यातील सर्वात कठीण वर्ष होते. एका बाजूला हे नक्की झाले होते, की त्याना जगण्यासाठी पगार कमी पडत होता. तर दुसरीकडे त्याला सर्वजण विसरत चालले होते. एवढेच नव्हे, तर त्याच्यासाठी सर्वात वाईट व दुष्ट काय होते तर त्याच्यावर झालेला अन्याय इतरांना सामान्य वाटत होता. त्याच्या वडिलांना सुद्धा त्याला मदत करावीशी वाटली नाही. सर्वांनी आपल्याला दूर ढकलून दिल्याची भावना

इव्हानच्या मनात येऊ लागली. ३५०० रुबल्स पगार असलेले त्याचे पद हे लोकांना नशीबवान पण साधेच वाटू लागले. त्याच्यावर झालेल्या अन्यायाची फक्त त्याच्या सद्‌सदविवेक बुद्धीलाच चाड होती. त्यातच त्याच्या बायकोच्या सतत चाललेल्या कटकटींमुळे व कर्जबाजारीपणामुळे त्याची अवस्था फारच लाजीरवाणी झाली होती.

त्या उन्हाळ्यात पैसे वाचवण्यासाठी, त्याने रजा काढली व त्याच्या बायकोबरोबर तो गावाला तिच्या भावाकडे गेला. तिथे काही काम नसल्याने, आयुष्यात पहिल्यांदाच त्याला असमाधानी व उदास वाटू लागले. असे आयुष्य जगणे अशक्य असल्याचे, त्याला जाणवले. काही कामाला लागणे आवश्यक ठरले.

व्हरांड्यात वरखाली फेऱ्या मारत, झोप न येणारी रात्र घालवल्यावर, त्याने पिट्सबर्गला जाऊन त्याच्यावर टीका करणाऱ्यांना शिक्षा करून, दुसऱ्या ठिकाणी बदली मागायचे ठरवले.

वर्षाला पाच हजार रुबल्स पगार असलेली नोकरी पटकवायची, असे ठरवून दुसऱ्या दिवशी त्याच्या बायकोचा व तिच्या भावाचा विरोध पत्करून, तो पिट्सबर्गला निघाला. अमुकच विभाग हवा, अमुकच प्रकारचे काम हवे किंवा अमुक

प्रकारची वागणूक मिळायला हवी, असे काही त्याच्या डोक्यात नव्हते. फक्त वर्षाला पाच हजार रुबल्स पगार असलेली बँकेतील, प्रशासकीय, रेल्वेत अथवा कस्टम्समध्ये नोकरी पटकवायची, एवढेच तो जाणत होता.

इव्हानची ही मोहीम त्याला उल्लेखनीय व मोठे यश देऊन गेली. कूर्स्कमध्ये पहिल्या वर्गाच्या डब्यात लीयीन नावाचा त्याच्या ओळखीचा एक माणूस त्याच्याशेजारी बसला होता. तेथील सरकारमध्ये लवकरच काही बदल होणार असल्याची तार त्याला आली असल्याचे त्याने इव्हानला सांगितले. पीटर इव्हानोवीच इव्हानची जागा घेणार होता.

रशियासाठी या बदलाचे असलेले महत्व सोडले, तरी इव्हानसाठी त्याचे महत्व अनन्यसाधारण होते. कारण नवीन माणसाला म्हणजे पीटर व त्याच्याबरोबर त्याचा मित्र, झाचार इव्हानोविच, जो इव्हानचाही मित्र होता, याना पुढे आणून, इव्हानचा फायदा होत होता.

मॉस्कोमध्ये ही बातमी पक्की होती. पिट्सबर्गला पोचल्यावर इव्हानने झाचारला शोधले व त्याच्याकडून त्याला स्वतःला न्याय विभागात नेमणूक मिळण्याची खात्री देण्यात आली.

एका आठवड्याने त्याने बायकोला लिहिले, “मिलर येथील झाचारने मला नोकरी मिळवून दिली आहे. मी माझी कागदपत्रे सादर केली, की मला नेमणुकीचे पत्र मिळेल.”

इव्हानला त्याने पूर्वी काम केलेल्या ठिकाणीच त्याच्या बरोबरीच्या लोकांपेक्षा दोन पदे वर नेमणूक मिळाली. शिवाय त्याच्या मनाप्रमाणे वर्षाला पाच हजार रुबल्स पगारही मिळाला. आणि वरती तीन हजार पाचशे रुबल्स इतका इथे येण्यासाठीचा खर्चदेखील मिळाला. त्याच्या विभागाबद्दल व तेथील लोकांबद्दल त्याच्या मनात असलेला आकस जाऊन इव्हान पूर्णपणे आनंदी झाला.

जास्त आनंदी व समाधानी होऊन तो परतला. प्रॅस्कोव्हयाही खूश झाली. त्या दोघांमध्ये समझोता झाला. इव्हानने सांगितले, की पिट्सबर्गमध्ये त्याला कसा मान मिळाला, कसे त्याच्या सर्व शत्रूंना लाज वाटून ते प्रेमप्रदर्शन करू लागले, त्यांना इव्हानच्या नेमणुकीचा किती हेवा वाटला व पिट्सबर्गमध्ये तो सगळ्यांना कसा आवडला.

प्रॅस्कोव्हयाने सर्व ऐकून घेतले व ते सर्व तिला खरे वाटल्याचे भासवले. तिने कशावरही संशय घेतला नाही. ती पण तिथे रहाण्याचे बेत करू लागली. इव्हानने आनंदाने ते त्याचे बेत

असल्याचे पाहिले. म्हणजे त्याचे व बायकोचे एकमेकांशी पटले होते. त्यामुळे काही काळानंतर त्याचे आयुष्य योग्य रीतीने, नैसर्गिकपणे, मनमिळाऊपणे, आनंदाने व छान स्वरूपात चालू झाले.

इव्हान तिथे थोड्या काळासाठीच आला होता. १० सप्टेंबरला त्याला नवीन कामावर रुजू व्हायचे होते. शिवाय तिथे नवीन जागी स्थिरस्थावर व्हायला काही वेळ लागला असता. येथील सामान न्यायला व काही नवीन वस्तू खरेदी करायला व त्याच्या मनाप्रमाणे सर्व व्यवस्था करून घ्यायला, जे प्रॅस्कोव्हयाच्यादेखील मनात होते, काही वेळ लागला असता.

आता सर्व काही चांगल्या नशीबाप्रमाणे झाले आणि तो व त्याच्या बायकोचे उद्दिष्ट एकच झाले होते. आता ते एकमेकांचे उणेदुणे काढेनासे झाले. लग्नानंतर त्यांचे नाते चांगले होते, तसे परत झाले. इव्हानने लगेच त्याच्याबरोबर त्याच्या कुटुंबाला न्यायचे ठरवले. प्रॅस्कोव्हयाचा भाऊ व वहिनीच्या अचानक उद्भवलेल्या मित्रत्वाच्या सुखद नात्याने, त्यांनी प्रॅस्कोव्हयाला आग्रह केल्याने तो एकटाच गेला.

त्याचे व बायकोचे छान पटल्यामुळे व त्यांचे संबंध गहिरे झाल्याने, तो व त्याच्या बायकोचे आनंदी घराचे स्वप्न प्रत्यक्षात

आले होते. त्याच्या यशामुळे, तो प्रफुल्लीत होऊन गेला. जुन्या पद्धतीचा प्रशस्त, उंच हॉल व खोल्या, त्याच्या मुलासाठी सोयीस्कर व अद्ययावत अभ्यासिका, असे हे घर जणू त्यांच्यासाठीच बांधले होते. इव्हानने स्वतः घराची व्यवस्था पाहिली. भिंतींला चिकटवण्याच्या कागदाची निवड केली. अजून काही फर्निचर आणले. [ चांगल्यापैकी लाकडाचे, जुने व मूल्यवान ] व स्वतःच्या देखरेखीखाली, त्याला कुशन बसवून घेतले. त्याच्या आदर्शांप्रमाणे हळूहळू सर्व काही तयार झाले. काही गोष्टी अर्धवट तयार असल्या तरीही त्याला खूप समाधान देऊन गेल्या. हिन दर्जापासून दूर एकदम छान पॉलिश केलेले दर्जेदार फर्निचर, तयार होऊ लागले. त्याचा हॉल किती छान दिसेल ते झोपेत नजरेसमोर येऊ लागले. शेकोटी, भिंतीवरच्या शोभिवंत वस्तू, पडदा, छोट्या खुर्च्या आणि काय काय त्याला दिसू लागले. त्याची बायको व मुलगी यांनी त्याच्या मताला पसंती दिली होती. हे सर्व बघून त्या किती खूश होतील, हे आठवून तो प्रसन्न झाला. त्याना इतके दर्जेदार काही बघायला मिळण्याची अपेक्षा नसेल, असा विचार तो करत होता. यामुळे घराला सरदारी थाटाचा रंग आला होता. पण पत्रात त्याने असे इतके जास्त वर्णन केले नव्हते. कारण त्याला त्याना एकदम आश्चर्यचकित करायचे होते. सर्व मूल्यवान वस्तू त्याने शोधून

शोधून कमी भावात आणल्या होत्या. असे घर सजवण्यात तो इतका गुंतून पडला की कार्यालयातील कामामध्ये त्याला पूर्वीपेक्षा कमी रुची वाटू लागली. कधी कधी त्याच्या हातून विसराळूपणा देखील होऊ लागला. कोर्टातील सुनावणीच्या वेळी तो विचार करत असे, की पडद्यांना सरळ शेवट असावा की वक्राकार असावा. या सर्व गोष्टींमध्ये त्याला इतकी आवड निर्माण झाली की तो स्वतः जातीने सर्व काही करे. फर्निचरची जागा हलवून पाही. पडदे पुन्हापुन्हा टांगून पाही. एकदा पडदे लावणाऱ्या सजावट कारागीराला शिडीवर चढून, पडद्यांचा नोकझोक कसा असावा, हे नीट समजावून सांगतांना, एक पायरी वगळली गेल्यामुळे तो पडला. पण चपळ व मजबूत असल्याने, तो खिडकीच्या चौकटीला चिकटून राहिला व त्याला फक्त एका बाजूला खरचटले. तेथील कातडी काळीनिळी पडून दुखू लागली. पण लवकरच कळा कमी होऊन त्याला बरे वाटू लागले. त्याने लिहिले, ‘मला पंधरा वर्षांनी तरूण झाल्यासारखे वाटते आहे. त्याला वाटले सप्टेंबरपर्यंत सर्व काही करून होईल. पण ते ऑक्टोबरच्या मध्यापर्यंत लांबले. पण सगळे काही फक्त त्याच्या डोळ्यांनाच नव्हे तर सर्वांनाच छान दिसू लागले.

खरे तर जे लोक मध्यमवर्गीय आहेत पण श्रीमंत होऊ इच्छीतात, त्यांच्या घरासारखे इव्हानचे घर दिसत होते. पडद्यांचे उत्तम रेशमी कापड, शिसवी लाकूड, फुलझाडे, गालिचे, ब्रॉन्झच्या वस्तु --- विशिष्ट वर्गाच्या बरोबरीचा सर्व थाटमाट! त्याच्या बरोबरीच्या इतर लोकांसारखेच त्याचे घर दिसत होते. पण त्याला ते अगदी विशेष असे भासत होते. तो त्याच्या कुटुंबाला स्टेशनवर भेटला, तेव्हा तो आनंदित झाला. त्याने त्यांना नवीन चकाचक घरात आणले. पांढरा टाय घातलेल्या नोकराने दार उघडले. घरभर फिरून मंडळी आश्चर्यचकित झाली व त्याची स्तुती करू लागली व प्रसन्न झाली. संध्याकाळी चहा पितांना, प्रॅस्कोव्हयाने इतर गोष्टींबरोबर तो पडला होता, त्याबद्दल विचारले. त्याने हसून तो कसा पडला व त्याने त्या सजावट कारागीराला कसे घाबरवले, ते सांगितले.

“मी थोडाफार खेळाडू होतो म्हणून बरे झाले. इतर एखादा माणूस मेला असता. पण मला फक्त इथे खरचटले. तेव्हा ते झोंबत होते, पण आता ते बरे झाले --- मात्र अजून थोडेसे काळेनिळे राहिले आहे.”

तर अशा तऱ्हेने ते नवीन घरात राहू लागले. नेहमीप्रमाणे जसेजसे दिवस गेले, तसतशी त्यांना एक खोली कमी पडू

लागली. वाढत्या खर्चांमुळे, पैसे नेहमीच कमी वाटतात [ पाच हजार रुबल्स ] पण तसे सर्व काही छान चालले होते.

सारे काही नीट लागी लागले व काही गोष्टी करणे चालू होते, तेव्हा पहिल्यांदा सर्व सुरळीत चालू होते. ही गोष्ट आणली, ती मागवली, ही हलवली, इतर काही मार्गी लावले. नवराबायकोत काही वाद झाले, तरी ते दोघे इतके समाधानी होते व करायच्या इतक्या काही गोष्टी होत्या, की ते वाद विसरले गेले. जेव्हा सगळे आवरून झाले, तेव्हा करायला काहीच न उरल्याने, उदास वाटू लागले व काही उणे भासू लागले. मग ते लोकांशी ओळखी करून घेऊ लागले. त्यांच्या सवयी ठराविक झाल्या आणि आयुष्य भरीव भासू लागले.

इव्हान त्याची सकाळ कायद्याच्या कोर्टात घालवी. जेवायला घरी येई. सुरवातीला तो चांगल्या मनस्थितीत असे. काही प्रसंगी चिडे. [ टेबलक्लॉथवरील वा पडद्यांवरील डाग, खिडकीचे ब्लाइंड्स [ प्लॅस्टीक पडदे ] ओढायची तुटकी दोरी, हे त्याला राग आणी. कारण त्याने त्यासाठी एवढे कष्ट घेतले होते, की त्याला जरा काही वेडेवाकडे झाले, की तो खट्टू होई. पण एकंदरीत त्याचे आयुष्य, त्याला हवे होते तसे चालू होते. साधे, आनंदी व थोडे झगमगाटी!

इव्हान नऊ वाजता उठला. कॉफी प्यायला. वर्तमानपत्र वाचले. मग त्याचा गणवेष घातला आणि कायद्याच्या कोर्टात गेला. तिथे तो कामाला जुंपला गेला. ते त्याने कुरकुर न करता केले. अर्जविनंत्या, चौकशा, प्रशासकीय आणि इतर लोकांच्या बैठका, दंडाधिकारी स्वतः, या सर्वांना तोंड दिले. या सर्वात बेचैन करेल असे ताजे व महत्वाचे काही नव्हते. लोकांबरोबरचे कामाचे संबंध व फक्त कामापुरतेच! उदाहरणार्थ, एक माणूस येईल, त्याला काही माहिती हवी असेल. इव्हानच्या कार्यक्षेत्रात हे येत नसल्याने, त्याला काही करायचे नसे. पण त्याचे कायद्याच्या बाबतीत काही काम असेल, तर स्टँपपेपरवर तो काही लिहून देऊ शके. नातेसंबंधातील मर्यादा लक्षात घेऊन, त्या बाबतीतले सगळे तो करे आणि असे करतांना, ते नातेसंबंध मानवी मैत्रीचे ठेवे. म्हणजे जीवनाविषयी नम्रपणा दाखवे. जेव्हा ते नातेसंबंध संपत, तसे त्या बाबतीतले सर्व संपून जाई. इव्हानला सरावाने व तसा दृष्टीकोन ठेऊन, त्याचे व्यक्तिगत आयुष्य, कार्यालयीन आयुष्यापासून वेगळे काढता येई. कधीकधी श्रेष्ठ कलाकारासारखे तो दोन्ही एकत्र करे. तो हे करे कारण त्याला वाटे, की तो कधीही माणसांचे नाते बाजूला करून, परत कार्यालयीन कामात शिरू शकतो. तो हे सहज, आनंदाने, बरोबर व कलाकाराच्या कौशल्याने करू शके.

दोन सुनावणींच्या मध्ये तो सिगरेट ओढे, चहा पिई. राजकारणावर थोडे बोले, थोडे सामान्य विषयांवर बोले. थोडे पत्त्यांबद्दल बोले. पण तो सर्वात जास्त कार्यालयीन नेमणुकांबद्दल बोले. दमलेला परंतु मोठ्या कलाकाराच्या भावना असलेला असा तो होता. वाद्यवृंदात सुरेख वाजलेले पहिले व्हायोलीन त्याचे असे! तो घरी येत असे, तेव्हा त्याची बायको व मुलगी कुणाला भेटायला गेलेल्या असत किंवा कुणी पाहुणा आलेला असे. आणि मुलगा शाळेत गेलेला असे किंवा त्याने शिकवणीच्या शिक्षकांबरोबर त्याचा घरचा अभ्यास केलेला असे. तो शाळेत शिकवलेले शिक्षकांकडून परत नीट शिकत असे. सर्व काही असायला पाहिजे, तसे असे. जर पाहुणे नसतील, तर कधीकधी इव्हान त्यावेळी गाजलेले पुस्तक वाचत असे. तुलनात्मक रीत्या, साक्षीदारांचे पुरावे ऐकणे, त्याला अनुसरून असलेले नियम लावत परिच्छेद लिहून काढणे. हे कंटाळवाणे नव्हते व मनोरंजकही नव्हते. तो ब्रिज खेळत असे, तेव्हा त्याला ते कंटाळवाणे वाटे. पण जर ते खेळणे थांबले असते, तर बायकोबरोबर किंवा नुसते बसावे लागले असते. इव्हानला दुसऱ्यांना लहानसहान जेवणे देणे आवडे. त्यासाठी तो चांगल्या सामाजिक स्थानावरील स्त्रिया व पुरुषांना आमंत्रित करे. त्याचा

इतरांसारख्याच असलेल्या हॉलमध्ये इतरांसारख्याच मेजवान्या चालत.

एकदा त्यांनी नाच पण ठेवला होता. इव्हानने त्याचा खूप आनंद घेतला. त्याच्या बायकोबरोबर त्याचे केक आणि मिष्टान्नावरून कडाक्याचे भांडण झाले, एवढे सोडल्यास सर्व काही सुरळीत पार पडले. प्रॅस्कोव्हयाने स्वतःचे बेत ठरवले होते. पण इव्हानने महाग बेकरीवाल्याकडून खूप केक मागवले होते. त्यातील काही उरले व त्यांची किंमत पंचेचाळीस रुबल्स झाली. त्यामुळे परस्परविरोधी मते असलेले जोरदार भांडण झाले. प्रॅस्कोव्हया त्याला ‘मूर्ख व आचरट’ म्हणाली. त्याने त्याचे डोके दाबून, अस्पष्टपणे काडीमोडाची मागणी केली.

पण नाचाने मजा आली. तिथे अभिजन होते. राजकन्या ट्रफोनियाबरोबर इव्हान नाचला. ‘बेअर माय बर्डन’ नावाच्या संस्थेच्या मान्यवर संस्थापकाची ती बहीण होती.

या आनंदामुळे त्याचा कामातील आनंद व महत्वाकांक्षा वाढली. सामाजिक आनंदातील स्वाभिमान वाढला. पण इव्हानला जास्त आनंद ब्रिज खेळण्यात होत असे. त्याला समजले होते, की आयुष्यात न पटणारे प्रसंग आले, तरी दुसऱ्या कशाहीपेक्षा गडबड न करणाऱ्या चांगल्या खेळाडूंबरोबर ब्रिज

खेळण्याचा आनंद उगवणाऱ्या सूर्यकिरणासारखा होता. हा चारजणांचा ब्रिजचा खेळ होता. [ पाच खेळाडू म्हणजे त्रासदायक होते. तरी तो त्रास नसल्याचे सर्वजण भासवत. ] गंभीरपणे चांगले खेळणे [ पत्ते चांगले येतील तेव्हा ] व त्यानंतर पेलाभर वाईन व जेवण मिळेल तेव्हा, विशेषतः थोडेफार पैसे जिंकले असतील तेव्हा, [ जास्त पैसे मिळणे आनंददायी नसे. ] इव्हान विशेष विनोदी, छान मनस्थितीत अंथरुणावर पडे.

तर असे आयुष्य चालले होते. त्यांनी चांगल्या लोकांच्या ओळखी करून घेतल्या होत्या. महत्वाचे तरुण लोक त्याना भेटायला येत. त्यांच्या दृष्टीकोनातून, नवरा बायको व मुलगी भेटायला येणे पूर्णपणे मान्य होते. हे न सांगता समजले जाई व सर्व त्यांना एका हाताच्या अंतरावर ठेवत. जे प्रेमाचे प्रदर्शन करून घाईने हॉलमध्ये शिरत, त्या गचाळ मित्रांना टाळले जाई. लवकरच फक्त उत्तम मित्र त्याच्या गटात रहात.

तपासणी दंडाधिकारी असलेला पेट्रीश्चेव्ह आणि पेट्रीश्चेव्हचा मुलगा व एकुलता एक वारस असलेला दिमित्री इव्हॅनोव्हीच, त्याच्या मुलीकडे, लीसाकडे, इतके लक्ष द्यायला लागले, की इव्हान आधीच प्रॅस्कोव्हयाशी त्याबद्दल बोलला. त्यांच्यासाठी

एक मेजवानी आखावी की एखाद्या थिएटरमध्ये नाटकाला जावे, याचा ते विचार करू लागले.

तर असे आयुष्य जगतांना काही बदल न होता, सर्व काही उत्तम चालले होते. आयुष्य म्हणजे जणू सुखाचा झरा होता.

## चार

त्यांची सगळ्यांची प्रकृती चांगली होती. कधीकधी इव्हान म्हणत असे की त्याच्या तोंडात विचित्र चव येते आणि डाव्या बाजूला काही अस्वस्थ असे वाटते. पण म्हणजे काही त्याची तब्येत खराब आहे, असे म्हणता आले नसते.

पण हा अस्वस्थपणा वाढला आणि नेमके दुखत नसले, तरी त्या बाजूला जास्त ताण येऊ लागला व वाईट विचार मनात येऊ लागले. गोलोव्हीन कुटुंबातील आयुष्ये साधी सोपी होती. पण त्याची चिडचिड वाढली आणि सहन करायच्या पलीकडे जाऊ लागली. नवरा बायकोची जास्त जास्त भांडणे होऊ लागली. स्वस्थपणा व सोयीस्करपणा नाहीसा झाला व चांगले संबंध ठेवणे अवघड ठरू लागले. परत भांडणांचे प्रसंग घडू लागले. नवरा बायकोत स्फोट न होणारी बेटे अगदी थोडी राहिली. प्रॅस्कोव्हयाला आता कुरकुर करायला हे एक चांगले कारण मिळाले की नवरा सारखा चिडलेलाच असतो. गेली वीस वर्षे त्याचा हा असा स्वभाव ती सहन करत आहे. हे खरे होते की आता भांडणे त्याच्याकडून सुरु होत होती. बहुधा जेवणाच्या आधी सूप पितांना, त्याचा राग उफाळून येई. कधी त्याच्या लक्षात येई की ताटलीला तडा गेलेला आहे, पदार्थ ठीक झालेला नाही,

त्याचा मुलगा टेबलावर कोपरे टेकवून बसला किंवा त्याच्या मुलीने त्याला आवडतात तसे तिचे केस बांधले नाहीत. या सर्वासाठी तो बायकोला दोष देई. आधी ती रागाने त्याच्या अंगावर ओरडून, नको ते बोलली. एकदोन वेळा जेवण सुरु करतांना तो इतका रागावला, की तिच्या लक्षात आले की घास घेतांना त्याच्यात, काही मानसिक बदल होत आहे. त्यामुळे तिने तिचा राग काबूत ठेऊन जेवण संपवायची घाई केली. असे केल्याने तिला स्वतःचा अभिमान वाटला. तिच्या नवऱ्याच्या चिडचिड्या स्वभावाने तिचे आयुष्य केविलवाणे झाले आहे, असे तिला वाटून स्वतःची कीव आली. जितकी जास्त तिला स्वतःची कीव येऊ लागली, तितका जास्त ती नवऱ्याचा द्वेष करू लागली. तो मरावा असे तिला वाटू लागले. तरीही तो मरावा असे तिला वाटत नव्हते, कारण मग त्याचा पगार घरात येणे बंद झाले असते. ती स्वतःला खूप दुःखी समजत होती, कारण त्याच्या मृत्यूनेही प्रश्न सुटत नव्हता. ती तिचे दुःख लपवत असली, तरी त्यामुळेही त्याची चिडचिड वाढू लागली.

एका प्रसंगात इव्हान खरोखर बरोबर वागला नाही. त्याने असे स्पष्टीकरण दिले की त्याला बरे वाटत नसल्याने असे झाले. ती म्हणाली मग एखाद्या चांगल्या डॉक्टरकडे जायला हवे.

तो गेला. त्याच्या अपेक्षेप्रमाणे सर्व झाले व नेहमी तसेच होते. खूप वेळ थांबायला लागले आणि डॉक्टर त्याला माहिती असलेल्या चढेल पद्धतीने वागत होते. [ तो कोर्टात जसे वागत असे, तसेच! ] ज्यातून काही अनावश्यक निष्कर्ष निघत होते, असे उत्तरे अपेक्षित असलेले प्रश्न हे गरज नसलेले होते. “तुम्ही तुम्हाला माझ्या हवाली करा. मग मी जरूर ते सर्व करतो.” असा स्वतःच्या महत्तमतेचा भाव --- “संशयातीतपणे ते कसे बरे करायचे, ते मला माहिती आहे. ज्याना हा त्रास आहे, अशा सर्वांसाठी ती एकच पद्धत आहे.” .हे सर्व कायद्याच्या कोर्टात चालते, तसेच होते. तो जसा गुन्हेगार माणसाकडे बघे, तसाच कटाक्ष डॉक्टरांनी त्याच्याकडे टाकला.

डॉक्टर म्हणाले की अमुकतमुक बाबींवरून असे दिसते आहे, तुमच्या आत अमुकतमुक आहे. पण तपासण्यांमधून ते सिद्ध झाले नाही, तर मग त्याना असाअसा निष्कर्ष काढावा लागेल --- आणि असेच काही. इव्हानसाठी एकच प्रश्न महत्वाचा होता की त्याची केस गंभीर आहे का. पण डॉक्टरांनी त्या अयोग्य प्रश्नाकडे दुर्लक्ष केले. त्यांच्या दृष्टीने, त्याचे एवढे महत्व नव्हते. खरा प्रश्न होता --- मूत्रपिंड खाली येणे, नाकातील वा घशातील कफ आणि दाह किंवा आंत्रपुच्छाचा दाह. इव्हानला वाटले, की

डॉक्टरांनी हुशारीने सोडवलेला तो प्रश्न नव्हता. इव्हानला आंत्रपुच्छाचा दाह होत असल्याचे वाटत होते तर मूत्राच्या परीक्षेवरून, अशी सूचना मिळत होती, की याचे पुढे परीक्षण करावे. कोर्टात सुनावणीच्या वेळी इव्हानने हजार वेळा माणसांना असे हुशारीने आजमावले होते. डॉक्टरांनी त्याच्या चष्म्याकडे विजयाने बघत आनंदाने व हुशारीने जो निष्कर्ष काढला, त्यावरून इव्हानने ठरवले की आपले फारसे काही खरे नाही. पण डॉक्टरांसाठी वा इतरांसाठी, ते फारसे लक्ष देण्यासारखे नव्हते. त्याच्यासाठी मात्र ते फार वाईट होते. या निदानाने त्याला फार दुःख झाले. वेदनेने तो पिळवटला. त्याच्या मनात स्वतःबद्दलची दया व इतक्या महत्वाच्या बाबतीतील डॉक्टरांच्या दूरस्थपणाबद्दलचा कटूपणा दाटून आला.

तो याबद्दल काही बोलला नाही. उठला. डॉक्टरांची फी टेबलावर ठेवली व सुस्कारा टाकून बोलला, “आपण आजारी लोक नेहमी बहुधा अयोग्य प्रश्न समोर ठेवतो. पण मला सांगा, सामान्यपणे या तक्रारी धोकादायक असतात, नाही का?”

डॉक्टरांनी त्यांच्या चष्म्यातून एका डोळ्याने कडकपणे जणू असे म्हणण्यासाठी, त्याच्याकडे पाहिले, “अरे कैद्या, जर तू तुला

विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे दिली नाहीस, तर मला नाईलाजाने तुला कोर्टाबाहेर काढावे लागेल.”

इव्हान बोलला, “मी आधीच तुम्हाला गरजेचे व योग्य असे काय ते सांगितले आहे. त्याचे विश्लेषण अजून काही सांगेल.” यावर डॉक्टरांनी वाकून मान हलवली.

हळूहळू इव्हान बाहेर गेला. फार दुःखाने त्याच्या बर्फाच्या गाडीत बसला व ती चालवत घरी आला. सबंध वाटभर तो डॉक्टर काय म्हणाले, हा विचार करत होता. त्या अवघड, अगम्य, शास्त्रीय शब्दांचा साध्या भाषेत अर्थ लावायचा प्रयत्न करत होता. त्यातून त्याला पडलेल्या प्रश्नांचा अर्थ लावायचा प्रयत्न करत होताः “माझी अवस्था वाईट आहे का? ती फार वाईट आहे का? की अजून फारशी वाईट नाही?” आणि त्याला असे वाटत होते की डॉक्टरांच्या म्हणण्याप्रमाणे ती फार वाईट आहे. रस्त्यावरील सर्व काही त्याला उदासवाणे दिसू लागले. वाहनचालक, घरे, शेजारून चालणारे लोक, दुकाने, अंधःकारमय व फिकट दिसू लागली. त्याचे दुःख, मंदपणे पसरत जाणारे व कधीही क्षणभर देखील न संपणारे दुःख होते. डॉक्टरांच्या संशयास्पद शेऱ्यांमुळे फार गंभीर, नवे रूप धारण करत होते.

इव्हान आता ते जुलूम होत असल्याच्या नव्या दृष्टीने बघू लागला.

तो घरी पोचला व बायकोला सर्व काही सांगू लागला. ती ऐकत होती. पण मध्येच त्याची टोपी घातलेली व आईबरोबर बाहेर जाण्यासाठी तयार झालेली मुलगी आली. ती नाईलाजाने त्याचे एकसुरी सांगणे ऐकायला बसली. पण फार वेळ तसे करू शकली नाही. तिची आईदेखील शेवटपर्यंत त्याचे म्हणणे ऐकून घेऊ शकली नाही.

ती म्हणाली, "दुखण्याचे निदान झाल्याने मला आनंद झाला. आता तुमची औषधे वेळेवर घेत चला. मला तो कागद द्या. मी गेरॅसीमला औषधे आणायला पाठवते." आणि ती बाहेर जायला तयार होण्यासाठी निघून गेली.

ती खोलीत असेपर्यंत इव्हानला श्वास घ्यायला फुरसत मिळाली नव्हती. पण ती गेल्यावर त्याने लांब सुस्कारा टाकला.

त्याने विचार केला, "कदाचित ते एवढे वाईट नसेल."

त्याने औषधाचे डोस घ्यायला व मूत्रतपासणीनंतर बदललेल्या डॉक्टरांच्या सूचना पाळायला सुरवात केली. पण नंतर असे झाले, की मूत्रतपासणीनंतर बदललेल्या सूचना व

दिसणारी लक्षणे यात तफावत पडू लागली. डॉक्टरांनी सांगितलेले व प्रत्यक्ष होणारे हे वेगळे असल्याचे दिसू लागले. कदाचित त्याने डॉक्टरांपासून काही लपवले, सांगायला विसरला किंवा निष्काळजीपणा केला. तरीही त्याला त्याबद्दल दोष देता आला नसता. तो डॉक्टरांच्या सूचना सर्वसाधारणपणे पाळत राहिला. त्याला असे करून थोडा आरामही पडला.

डॉक्टरांना भेट दिल्यापासून, इव्हानचा एकच उद्योग झाला होता, की त्यांच्या आरोग्यासंबंधीच्या सूचना तंतोतंत पाळणे, औषधे घेणे, कितपत दुखते आहे याची नोंद घेणे व मलमूत्रविसर्जनावर बारीक लक्ष ठेवणे. लोकांची दुखणी व त्यांचे आरोग्य यात त्याला रुची निर्माण झाली. जेव्हा आजारपण, मृत्यू किंवा बरे होणे हे त्याच्यासमोर सांगितले जात असे, विशेषतः ते त्याच्या आजाराशी साम्य असलेले असे, तेव्हा तो ते काळजीपूर्वक ऐकत असे. पण काळजी दिसू न देता प्रश्न विचारत असे. त्यातील योग्य ते स्वतःच्या बाबतीत ताडून बघत असे.

त्याचे दुखणे कमी झाले नाही. पण इव्हान मुद्दाम होऊन स्वतः थोडी सुधारणा झाल्यासारखे समजू लागला. त्याला काही फार त्रास होत नव्हता, तोपर्यंत ते खपून गेले. पण बायकोबरोबर खटके उडू लागले, कार्यालयीन कामात काही अपयश आले,

किंवा ब्रिज खेळतांना वाईट पत्ते आले, तर त्याला स्वतःचा आजार तीव्रतेने जाणवे. सुरवातीला असे झाले तरी तो ते बदलायला सिद्ध होई. परत प्रयत्न करून यश संपादन करे. पहिल्यांदा तो अशा हुकलेल्या संधी लवकरच घेऊन त्या सुधारत असे व विजयश्री खेचून आणत असे. पण आता तसे न होता, तो उदास राहू लागला. तो स्वतःशी म्हणे, "मी मला सुधारण्याचा प्रयत्न करतो आहे, औषधे माझ्यावर चांगला परिणाम करत आहेत. तरी असे दुर्दैव व दुःख माझ्यावर चालून येत आहे. मग तो त्यावर व त्याला दुःखी करणाऱ्या लोकांवर चिडे. पण तो काही करू शकत नसे. एखाद्याने असा विचार केला असता, की परिस्थितीबरोबरचा व लोकांबरोबरचा त्याचा झगडा त्याचा आजार वाढवतो आहे. त्यामुळे त्याने अप्रिय गोष्टींकडे दुर्लक्ष करायला शिकले पाहिजे. पण तो नेमके उलटे वागे. तो म्हणे की त्याला शांती हवी आहे आणि त्याला त्रास होण्याची शक्यता असलेले थोडेदेखील काही बघून तो चिडे. वैद्यकशास्त्राची पुस्तके वाचून व डॉक्टरांचा सल्ला घेऊन, त्याची अवस्था अजून वाईट झाली. त्याचे दुखणे फार हळू वाढत होते. त्यामुळे दिवसागणिक ते त्याच्या लक्षात येत नसे. पण तो जेव्हा डॉक्टरांकडे जाई, तेव्हा त्याला ते भराभर वाढल्याचे जाणवे. तरी तो सतत डॉक्टरांकडे जाई.

त्या महिन्यात तो एका दुसऱ्या प्रसिद्ध डॉक्टरकडे गेला. त्याने सर्व काही पहिल्या डॉक्टरसारखेच सांगितले. पण प्रश्न वेगळ्या प्रकारे मांडले. पण याचा परिणाम इव्हानची भीती व शंका वाढवण्यात झाला. चांगला डॉक्टर असलेला त्याच्या मित्राच्या मित्राने त्याच्या आजाराचे इतरांपेक्षा वेगळ्या प्रकारे विश्लेषण केले आणि तो बरा होण्याची शक्यता असल्याचे भाकीत केले तरी इव्हानच्या शंका व गृहीतके अजूनच वाढली. एका होमिओपाथने अजून वेगळ्या प्रकारे विश्लेषण केले व वेगळी औषधे दिली. ती इव्हानने आठवडाभर गुपचूप घेतली. पण आठवड्याने काही सुधारणा न दिसल्याने, त्याने ती आत्मविश्वास गमावून, आधीच्या डॉक्टरांची व याचीही बंद केली. आता तो अधिकच निराश झाला. एक दिवस एका ओळखीच्या बाईने कुणा आश्चर्यकारक डॉक्टरने दुखणे बरे केल्याचे सांगितले. इव्हानने ते लक्ष देऊन ऐकले व त्याचा त्यावर विश्वास बसला. ‘खरेच यावर विश्वास ठेवण्याइतका मी इतका कमजोर झालो आहे का? हे सर्व बेकार आहे. मी उदास होऊन अशा गोष्टींवर विश्वास ठेवता कामा नये.’ त्याने स्वतःशी म्हटले. ‘मला माझ्या पहिल्या डॉक्टरला चिकटून राहिले पाहिजे. मी आता तेच करेन. आता हे ठरले. मी आता याबद्दल अजून विचार करणार नाही. मी उन्हाळ्यापर्यंत त्याची औषधे घेईन व मग काय ते बघू. आता

इकडेतिकडे धावणे बास झाले.' हे म्हणणे सोपे होते पण तसे वागणे कठीण होते. त्याच्या वेदना त्याला छळू लागल्या. त्या सतत व जास्त प्रमाणात होऊ लागल्या. त्याच्या तोंडाची चव विचित्र झाली. त्याच्या श्वासाला एक प्रकारची दुर्गंधी येऊ लागली. त्याला स्वतःची भूक व शक्ती मंद झाल्याची जाणीव झाली. स्वतःला फसवणे शक्य नव्हते. काहीतरी भयंकर, नवीन व आयुष्यातील कशाहीपेक्षा महत्वाचे, असे काहीतरी त्याच्या आत आकार घेत होते. आणि ते फक्त त्यालाच जाणवत होते. सर्व जग नेहमीप्रमाणे चालू होते, पण त्याच्या भोवतालच्या लोकांना ते समजत नव्हते. हे बघून इव्हानला अजून वाईट वाटले. त्याला जाणवले की त्याच्या घरची मंडळी, विशेषतः त्याची बायको व मुलगी या त्यांच्या सामाजिक भेटींमध्ये दंग होत्या. त्यांना काही कळत नव्हते. उलट इव्हान इतका उदास व जेवढ्यास तेवढे वागत असलेला बघून, रागावत होत्या. जसे काही ती त्याचीच चूक होती.

ते त्या लपवायचा प्रयत्न करत असल्या, तरी त्याला हे समजत होते की तो त्यांच्या वाटेमधील अडथळा ठरत होता. त्याच्या आजारपणाबद्दल एक ठराविक वाक्य उच्चारायची सवय त्याच्या बायकोने लाऊन घेतली होती. त्याने काही केले किंवा

म्हटले तरी तिचे तेच पालुपद सुरु असे. तिचा दृष्टीकोन असा होता व ती तिच्या मैत्रिणींना असे म्हणे, “तुम्हाला माहिती आहे का, इतर लोकांसारखे इव्हानला करता येत नाही. डॉक्टरने सांगितलेले उपाय त्याला चालू ठेवता येत नाहीत. एक दिवस तो एक प्रकारचे थेंब घेईल व खाण्यापिण्याचे पथ्य पाळेल. वेळेवर झोपायला जाईल. पण मी लक्ष ठेवले नाही, तर दुसऱ्या दिवशी तो तो औषध विसरेल. त्याला बंदी असलेला स्टर्जीन मासा खाईल. रात्री एक वाजेपर्यंत पत्ते खेळत बसेल.”

इव्हान रागावून विचारे, “असे कधी झाले? फक्त एकदा पीटर बरोबर असतांना.”

“आणि काल शेबेकबरोबर.”

“हे बघ, मी तसे केले नसते, तरी त्या वेदनेने मला जागे ठेवलेच असते.”

“अशा तऱ्हेने तू कधीच बरा होणार नाहीस व आम्हाला कीव करण्याजोगे बनवशील.”

प्रॅस्कोव्हयाचा इव्हानच्या आजारपणा बाबतचा दृष्टीकोन असा होता आणि ती तो इव्हानजवळ व इतरांजवळदेखील बोलून दाखवी. तो जणू त्याचा दोष होता आणि अशा तऱ्हेने तो तिला

त्रास देत होता. इव्हानला वाटे अशा दृष्टिकोनामुळे ती आरामात निसटून जाते --- पण त्याला काहीच मदत होत नाही.

कायद्याच्या कोर्टातही इव्हानला स्वतःबद्दल विचित्र दृष्टीकोन जाणवला किंवा जाणवला आहे असे त्याला वाटले. कधीकधी त्याला वाटे की लोक त्याच्याबद्दल नको इतक्या चौकशा करत आहेत. त्याना वाटते आहे की लवकरच त्याची जागा रिकामी होणार आहे. परत त्याचे मित्र अचानक त्याला त्याच्या निरुत्साहाबद्दल मित्रभावनेने छेडू लागले. त्याच्या आत काही भयानक, भीतीदायक आणि कधी न ऐकलेल्या अशा काळजीच्या गोष्टी सतत सुरु झाल्या. त्याच्या विरोधाला न जुमानता त्या होत राहिल्या. हा मोठा विनोद होता. विशेषतः श्चवाट्झ त्याच्या विनोदांनी, आकर्षकतेने व योग्य काही करण्याच्या क्षमतेने त्याला राग आणू लागला. त्याला बघून त्याला आठवले की दहा वर्षांपूर्वी तो असाच होता.

त्याच्या कंपूमधील मित्र आले व ते पत्ते खेळायला बसले. त्यांनी कोरे पत्ते वाकवून, थोडे मऊ केले. त्याने त्याच्या हातातील एक्के वाटले आणि ते सात होते. त्याचा भिडू म्हणाला. “हुकुम नाही.” व त्याला दोन एक्क्यांनी मदत केली. अजून काय हवे होते? ते उत्फुल्ल व आनंदी होते. त्यांनी खेळी जिंकली असती.

पण अचानक इव्हानला त्याचे तोंडाची चव बिघडवणारे, ठुसठुसणारे दुःख आठवले. अशा परिस्थितीत त्याने खेळी जिंकणे अशक्य होते.

त्याने त्याच्या भिडूकडे मिखाईलकडे, पाहिले. तो त्याच्या बळकट हाताने टेबल बडवत होता. त्याने पत्ते झटपट पण बेताने इव्हानकडे ढकलले, जेणेकरून त्याला त्रास न होता ते उचलून घेता यावेत. इव्हानने विचार केला, "माझे हात ताणून धरायला मी अशक्त आहे, असे त्याला वाटते आहे का" आणि तो काय करतो आहे, हे विसरून, त्याने त्याच्या भिडूला लबाडीने बनवले. तीननी विजय हुकला. सर्वात भयंकर काय होते, तर मिखाईल त्यामुळे फार नाराज झाला. पण त्याने फार पर्वा केली नाही. त्याने तसे का केले हे जाणून घेणे भयानक होते.

त्या सर्वांनी पाहिले की त्याला त्रास होत होता व ते म्हणाले, "तू दमला असशील, तर आपण थांबूया. विश्रांती घे. पडतोस का?" नाही, तो मुळीच दमला नव्हता. त्याने डाव संपवला. सगळे शांत होऊन मरगळले होते. इव्हानला वाटले, की त्याने त्यांना असे बनवले आहे आणि तो ते बदलू शकत नाही. त्यांनी जेवण केले व निघून गेले. इव्हान एकटा असा विचार करत राहिला, की त्याने स्वतःचे व त्याबरोबर इतरांचेही आयुष्य विषारी बनवले

आहे. ते विष कमी न होता त्याच्या शरीरात अधिकाधिक भिनते आहे.

या सद्सदविवेकबुद्धीने, शारीरिक वेदनांशिवाय वाटणाऱ्या भीतीने, त्याने आता झोपायला जावे. पण रात्रीचा जास्त वेळ तो जागाच राही. दुसऱ्या दिवशी सकाळी तो परत उठे. कपडे करून कायद्याच्या कोर्टात जाई. बोले, लिही. जर बाहेर गेला नाही, तर घरातच चोवीस तास काढे. त्यातील प्रत्येक तास म्हणजे छळ असे. त्याला खोल दरीच्या कडांवर अगदी एकट्याने उभे रहावे लागे, कोणीच त्याला समजून घेत नसे वा दया दाखवत नसे.

## पाच

असा एक महिना गेला. मग दुसरा गेला. नवीन वर्षाच्या आधी त्याचा मेहुणा शहरात आला व त्यांच्या घरी राहिला. इव्हान कोर्टात गेला होता आणि प्रॅस्कोव्हया खरेदीला गेली. जेव्हा इव्हान घरी येऊन त्याच्या अभ्यासिकेत गेला, तेव्हा त्याला तिथे त्याचा मेहुणा आढळला --- आरोग्यपूर्ण व लाल कांतीचा मनुष्य --- तो त्याची प्रवासी बॅग उघडत होता. इव्हानचा पदरव ऐकून, त्याने एकही शब्द न बोलता वर बघितले. त्या नजरेने इव्हानला सर्व काही सांगितले. मेहुण्याने आश्चर्योद्गार काढण्यासाठी तोंड उघडले पण थांबला. त्याच्या त्या कृतीने सर्व काही सांगितले.

“मी बदललो आहे का?”

“हो. बदल झाला आहे..”

आणि त्यानंतर त्याने मेहुण्याला त्याच्या दिसण्याकडे वळवले. मेहुणा त्याबद्दल काही बोलला नाही.

प्रॅस्कोव्हया घरी आली आणि मेहुणा तिच्याकडे गेला. इव्हानने दाराला आतून कडी लावली व आरशात स्वतःला न्याहाळायला सुरवात केली. पहिल्यांदा पूर्ण चेहरा, मग कडेने बघितले. त्याने बायकोबरोबर काढलेले त्याचे चित्र बाहेर काढले

आणि त्याच्या आरशातील छबीबरोबर त्याची तुलना केली. त्याच्यात खूपच फरक पडला होता. मग त्याने कोपरापर्यंत हात उघडे केले. त्याकडे पाहिले, परत शर्टाच्या बाह्या खाली केल्या. बुटक्या सिटीवर बसला व रात्रीपेक्षा काळा पडला.

तो स्वतःशीच बोलला, "नाही. असे चालणार नाही. उडी मारून टेबलाशी गेला. कायद्याचे काही कागद घेतले व ते वाचू लागला. पण फार वेळ वाचू शकला नाही. त्याने दार उघडले आणि हॉलमध्ये जाऊ लागला. पण ते दार बंद होते. त्याने गुपचूप दबक्या पाऊलांनी आतील बोलणे ऐकले.

प्रॅस्कोव्हया बोलत होती, "नाही तू वाढवून सांगतो आहेस."

"वाढवून? तुला ते दिसत नाही का? का तो मृत झाला आहे? त्याचे डोळे बघ --- त्यात काही जिवंतपणा नाही. पण त्याला काय झाले आहे?"

"कुणालाच माहिती नाही. निकोलेविच [ तो दुसरा डॉक्टर होता. ] काही म्हणाला. पण काय ते मला माहिती नाही. सेश्चेटीटस्काय [ हा प्रसिद्ध विशेष डॉक्टर होता. ] काही वेगळेच म्हणाला --- "

इव्हान निघून गेला. त्याच्या खोलीत गेला. पडला व विचार करू लागला. 'मूत्रपिंड, मूत्रपिंड खाली येणे!" सगळ्या डॉक्टरांनी

ते जागा सोडून कसे हलते आहे, ते सांगितले होते. कल्पना करायचा मोठा प्रयत्न करून, त्याने ते मूत्रपिंड पकडण्याचा व त्याला आधार द्यायचा प्रयत्न केला. त्याला वाटले, त्यासाठी फार थोडे काही करण्याची गरज होती. “नको. मी परत पीटरला भेटायला जातो. [ पीटर इव्हानचा मित्र होता व पीटरचा मित्र डॉक्टर होता. ] त्याने फोन करून टांगा मागवला व जाण्यासाठी तयार झाला.

चेहऱ्यावर विशेष दुःखी व दयाळु भाव ठेवून, त्याच्या बायकोने विचारले, “तू कुठे चालला आहेस?”

हा कधी न दिसणारा दुःखी व दयाळु भाव बघून तो चिडला. त्याने रागाने तिच्याकडे पाहिले.

“मला पीटरकडे गेले पाहिजे.”

तो पीटरकडे गेला व ते दोघे त्याचा मित्र असलेल्या डॉक्टरकडे गेले. तो भेटला. इव्हान त्याच्याशी बराच वेळ बोलला.

त्याच्या आत काय झाले आहे, याबद्दल शरीरशास्त्रदृष्ट्या व विश्लेषणात्मक रीत्या आढावा घेतला गेला. त्याला सर्व काही नीट समजले.

किड्यासारख्या दिसणाऱ्या आंत्रपुच्छात एक लहानशी गोष्ट होती. ते सर्व खरे असू शकेल. एका अवयवाच्या शक्तीला उत्तेजना देऊन, दुसऱ्या अवयवाचे कार्य तपासणे, मग शोषण होऊन, सर्व काही सुरळीत होईल. तो रात्रीच्या जेवणासाठी उशीरा घरी आला. जेवला व आनंदाने संभाषण केले. पण फार वेळ न थांबता त्याच्या खोलीत जाऊन कामाला लागला. शेवटी अभ्यासिकेत जाऊन, जरुरीचे काम केले. पण आपण काही महत्वाचे काम बाजूला टाकले आहे, असे त्याची सद्सदविवेकबुद्धी सांगू लागली. हे काम संपल्यावर, त्याने त्याकडे वळले पाहिजे --- हा विचार त्याची पाठ सोडेना. त्याचे काम संपल्यावर, त्याला आठवण झाली की हे काम त्याच्या किड्यासारख्या दिसणाऱ्या आंत्रपुच्छाबद्दल होते. पण त्याने तो विचार बाजूला सारला. तो चहासाठी हॉलमध्ये गेला. त्याच्या मुलीसाठी योग्य असलेला तपासणी दंडाधिकारी व इतरही काही लोक तिथे होते. त्यांचे संभाषण, पियानोवादन व गाणे चालू होते. प्रॅस्कोव्हयाने शेरा मारल्याप्रमाणे, इव्हानने ती संध्याकाळ नेहमीपेक्षा आनंदाने घालवली. पण आंत्रपुच्छाचा महत्वाचा विषय त्याने बाजूला टाकलेला असल्याचे, तो क्षणभरदेखील विसरला नाही. अकरा वाजता तो शुभरात्र म्हणून त्याच्या खोलीत झोपायला गेला. त्याच्या आजारपणापासून, तो अभ्यासिकेपुढील

खोलीत एकटाच झोपत असे. त्याने कपडे काढून, झोलाची कादंबरी वाचायला घेतली. पण ती वाचण्याऐवजी तो विचार करू लागला. त्याच्या कल्पनेत त्याने किड्यासारख्या दिसणाऱ्या आंत्रपुच्छात हवी तशी सुधारणा झालेली पाहिली. तिथे शोषण, रितेपणा व परत सामान्य क्रिया चालू होणे, सुरु झाले. तो स्वतःशी बोलला, ‘हे छान झाले. एखाद्याने निसर्गाला मदत करणे हेच अपेक्षित असते. त्याला औषधाची आठवण झाली. तो उठला. वेदना कमी करणाऱ्या औषधाच्या फायदा देणाऱ्या कृतीकडे लक्ष ठेवत तो पाठीवर झोपला. “मला हे औषध नियमितपणे घेतले पाहिजे आणि सर्व हानीकारक परिणाम टाळले पाहिजेत. “मला आधीच बरे वाटते आहे. जास्त बरे वाटते” आहे. तो कुशीवर वळला. “मला दुखत नाही. खरेच, मला दुखत नाही. ते आधीच बरे झाले आहे.” त्याने दिवा मालवला व तो कुशीवर वळला. “आंत्रपुच्छ बरे होते आहे. शोषले जाते आहे.” अचानक त्याला जुनी, नेहमीची, सतत ठुसठुसणारी गंभीर वेदना जाणवू लागली. नेहमीची विचित्र चव तोंडात आली. त्याच्या हृदयाला धडधड जाणवली. तो पुटपुटला, ’अरे देवा! अरे देवा! परत, परत! हे कधीच थांबणार नाही.” आधीच्या परिस्थितीत एकदम बदल झाला. “किड्यासारखे आंत्रपुच्छ! मूत्राशय!” तो स्वतःशीच बोलला. “हा आंत्रपुच्छ वा मूत्राशयाचा प्रश्न नाही, तर

जीवनमरणाचा प्रश्न आहे. हो. आता जीवन आहे. पण ते निघून चालले आहे. मी ते थांबवू शकत नाही. मी स्वतःला का फसवू? आता फक्त काही आठवड्यांचा, दिवसांचा --- किंवा ते कुठल्याही क्षणी होईल. उजेड आहे म्हणता म्हणता अंधार झाला आहे. आता मी या जगात आहे. पण आता मी दुसऱ्या जगात चाललो. म्हणजे कुठे? त्याच्या तोंडून अस्फुट किंकाळी बाहेर पडली. श्वास थांबला. फक्त त्याच्या हृदयाचे स्पंदन चालू राहिले.

मी नसेन, तेव्हा काय असेल? काहीच नसेल. हे मरणे आहे का? नाही, मला ते नको!" त्याने उडी मारून मेणबत्ती पेटवायचा प्रयत्न केला. त्याचे हात थरथरत होते. मेणबत्ती व तिचा स्टँड जमिनीवर पडला व उडून त्याच्या उशीवर पडला.

मोठे डोळे करून अंधारात बघत, तो स्वतःशीच बोलला, "याचा काय उपयोग आहे? याने काही फरक पडत नाही. मरण. हो, मरण. त्यांना कुणाला माहिती नाही व माहिती करून घेण्याची इच्छा नाही. त्यांना माझी दया येत नाही. ते खेळत आहेत. [ त्याला दारातून दूरवर गाण्याचा व त्याबरोबर काही लोकांचा आवाज आला. ] त्यांच्या दृष्टीने सर्व सारखेच आहे. पण तेही केव्हा ना केव्हा मरणार आहेतच. मूर्ख! मी प्रथम आणि ते नंतर,

पण त्यांनाही मरण येणार आहेच. आणि आता मोठा आनंद साजरा करत आहेत. रानटी पशू कुठले!”

रागाने त्याचा गळा दाटून आला. तो मानसिक त्रासाने असह्यपणे अस्वस्थ झाला. तो उठताना बोलला, “सर्व माणसांना हे भयानक क्लेश सोसावे लागणार आहेत, हे अशक्य आहे.”

“काहीतरी चुकते आहे. मी मला शांत ठेवले पाहिजे --- पहिल्यापासून याचा साकल्याने विचार केला पाहिजे.” तो पुन्हा विचार करू लागला. ‘हं, तर माझ्या आजाराची सुरवात. मी कुशीवर वळलो, तेव्हापासून झाली. पण तरी मी दिवशी त्या दिवशी व दुसऱ्या दिवशी ठीक होतो. मग ते थोडे दुखू लागले. मग दुखणे वाढले. मी डॉक्टरना भेटलो. माझे अवसान गळाले. वेदना होऊ लागल्या. मग अजून डॉक्टर्स! मग मी खोल दरीच्या कडेला आलो. माझी ताकद कमी झाली. मी दरीच्या अजून जवळजवळ आलो. माझ्या डोळ्यातील प्रकाश नाहीसा झाला. मी आंत्रपुच्छाचा विचार करतो आहे. पण हे तर मरण आहे! मी आंत्रपुच्छ बरे करायचा विचार करतो आहे आणि अचानक मरण समोर उभे ठाकले आहे. हे खरोखरच मरण आहे का?’

परत त्याला भीतीने ग्रासून टाकले. तो धापा टाकू लागला. तो खाली वाकला व त्याच्या अंथरुणामागे असलेल्या मेणबत्ती

स्टँडला कोपराने ढोसून, काडेपेटी शोधू लागला. ती त्याच्या वाटेत होती. तो अडखळला. त्याला राग आला. काडेपेटीवर जोर देऊन ती चिरडून टाकली. धापा टाकत व दुःख करत, तो पाठीवर कोसळला. लगेच मरण येण्याची अपेक्षा करू लागला.

मध्यंतरीच्या काळात पाहुणे निघाले होते. प्रॅस्कोव्हया त्यांचा निरोप घेत होती. तिने काही पडल्याचा आवाज ऐकला व ती आत आली.

“काय झाले?”

“मी अचानक अडखळून पडलो.”

ती बाहेर जाऊन मेणबत्ती घेऊन आली. एखाद्या हजार यार्ड धावलेल्या माणसासारखा, तो तिथे जोराने धापा टाकत पडलेला होता. त्याने तिच्याकडे टक लाऊन, वर निरखून पाहिले.

“इव्हान, काय झाले?”

“काही ना --- ही. मी ती काडेपेटी चिरडली. [ “मी का बोलावे? तिला काही कळणार नाही” असा विचार त्याने केला. ]

खरेच तिला कळत नव्हते. तिने स्टँड उचलला. मेणबत्ती पेटवली व घाईने दुसऱ्या पाहुण्याला निरोप देण्यासाठी गेली. ती परत आली तरी तो वर बघत पाठीवर पडून होता.

“हे काय? तुला फार बरे नाही का?”

“हो.”

तिने मान हलवली व ती खाली बसली.

“मला वाटते इव्हान, आपण लेष्चेटीटस्कीला तुला बघायला इथे बोलावू.”

म्हणजे पैशांचा विचार न करता, त्या प्रसिद्ध विषेतज्ञाला बोलावणे होते. तो खुनशीपणे हसला आणि म्हणाला, ‘नको.” ती काही वेळ स्तब्ध राहिली व त्याच्याजवळ येऊन त्याच्या कपाळाचे चुंबन घेतले.

ती तसे करतांना तो अगदी मनापासून तिचा द्वेष करत होता. मोठ्या मुश्किलीने त्याने स्वतःला तिच्यापासून दूर ढकलण्याचे वाचवले.

“शुभ रात्र. कृपया झोपायला गेलीस तर बरे.”

“हो.”

# सहा

इव्हानने पाहिले की तो सतत निराश होता व मरत होता.

त्याच्या हृदयात खोल त्याला मरण आल्याचे माहिती होते. या विचाराची त्याला सवय झाली होती. तरीही त्याला ते पचनी पडत नव्हते. पडू शकत नव्हते.

मग किसेवेट्टरच्या तर्कशास्त्रातून तो अशा गोष्टी शिकलाः कैस हा एक मनुष्य आहे. मनुष्य मर्त्य असतो. त्यामुळे कैस मर्त्य आहे. हे कैसच्या बाबतीत खरे होते. पण त्याच्या बाबतीत नव्हे. कैस हा कल्पनेतील मनुष्य आहे. तो मर्त्य आहे, हे बरोबर आहे. पण तो कैस नाही. तो कल्पनेतील मनुष्य नाही. तो खराखुरा प्राणी आहे. सगळ्यांपेक्षा भिन्न आहे. तो लहान वान्या [ हिब्रू गुलाम, देवाची देणगी ] आहे. त्याला आई वडील आहेत. मित्या [गोष्टीतली बालअभिनेत्री ] व व्होलोड्या [गुलाम बाळ असलेला जगाचा राजा ] आणि खेळणी, टांगेवाला, दाई, बालपणातील आनंद व दुःख, कुमारवय आणि तारुण्य, हे सगळे आहे. कैसला वान्याच्या खूप आवडत्या पट्टेरी चामड्याच्या चेंडूचा वास माहिती आहे का? कैसने कधी त्याच्या आईच्या हाताचे चुंबन घेतले आहे का? आणि तिचा रेशमी ड्रेस कधी कैसला स्पर्शून गेला आहे का? जेव्हा शाळेत केलेला केक बिघडला, तेव्हा

कैसने कधी आरडाओरडा केला आहे का? कैस कधी प्रेमात पडला आहे का? कैसने कधी परिषदेचे नेतृत्व केले आहे का? 'कैस मर्त्य होता आणि मरणे ही त्याच्यासाठी खरी गोष्ट होती. पण माझ्यासाठी, छोट्या वान्यासाठी, इव्हान इलयीचसाठी, माझ्या सर्व भावना व विचार यासकट, हे एकदम वेगळेच रसायन आहे. मी मेलेच पाहिजे, असे नाही. ते फार भयंकर असेल.'

अशा त्याच्या भावना होत्या.

तो स्वतःशीच बोलत होता. "जर मला कैससारखे मरायचे असते, तर मला ते माहिती असते. आतील आवाजाने मला ते सांगितले असते. पण असे काही नव्हते. मी आणि माझे मित्र यांना वाटले की आमची गोष्ट कैसपेक्षा वेगळी होती आणि आता ती तुमच्यासमोर आहे. असे होणार नाही. हे अशक्य आहे. पण ते दिसते तर आहे. असे कसे काय? एखाद्याने हे कसे समजून घ्यावे?

त्याला ते समजेना. तो हा खोटा, चुकीचा व नकोसा विचार असल्याचे स्वतःला समजावयाचा प्रयत्न करू लागला. त्याऐवजी योग्य, सुदृढ विचार त्याने मनात आणले. पण फक्त ते विचार नव्हे, तर सत्य परिस्थिती त्याला सामोरी आली.

ओळीने दुसऱ्यांचा विचार मनात आणून, त्याने काही आधार मिळायची आशा केली. पूर्वीचे, त्याला मरणापासून दूर नेणारे विचार तो मनात आणायचा प्रयत्न करू लागला. पण विचित्र म्हणजे, ते सर्व आधीच बंद झाले होते. लपले होते. त्याची मरणाविषयीची जागरूकता नाहीशी झाली होती. त्यात काही दम राहिला नव्हता. आता इव्हान त्याचा बहुतेक वेळ जुने विचार नव्याने सुरु करण्यात घालवे. तो स्वतःशी बोले, “मी परत माझे काम सुरु करतो --- शेवटी मला ते करायची सवय आहे. मग सर्व संशय मागे टाकून तो कोर्टात जाई. त्याच्या सहकाऱ्यांबरोबर संभाषण सुरु करे. त्याच्या नेहमीच्या वागणुकीप्रमाणे काळजी न करता बसे. ओकच्या खुर्चीवर त्याचे दोन्ही कृश हात ठेऊन गर्दीकडे विचारपूर्वक नजर लाऊन बसे. एखाद्या सहकाऱ्याकडे वाकत, व त्याचे कागद जवळ ओढत, कुजबुजत बसे. अचानक नजर उचलून ताठ बसत, काही शब्द म्हणत, कारवाईला सुरवात करे. परंतु कारवाईच्या मध्येच, ती किती करून झाली आहे याची दखल न घेता, त्याच्या कुशीमध्ये ठुसठुसणाऱ्या वेदना चालू होत. इव्हानचे लक्ष तिकडे वळते. तो ते विचार मनातून काढायचा प्रयत्न करतो, पण ते जमत नाही. ते त्याच्यासमोर येऊन उभे ठाकते व त्याच्याकडे बघत रहाते. तो दगडासारखा थिजतो. त्याचे डोळे विझून जातात. तो स्वतःला विचारत रहातो, की हे खरे आहे

की आभास. त्याच्यासारख्या हुशार व ठाम असणाऱ्या दंडाधिकाऱ्याचे गोंधळलेपण व चुका करणे, याचे नवल व दुःख वाटून त्याच्या हाताखालचे लोक व मित्र त्याच्याकडे बघत रहातात. तो स्वतःला हलवून, सावरायचा प्रयत्न करतो. कशीबशी कारवाई गुंडाळायचा प्रयत्न करतो. कायद्याचे काम करून दुखणे लपवायचा प्रयत्न फसला, या दुःखद जाणीवेने घरी परततो. सर्वात वाईट म्हणजे, ते दुखणे त्याला फक्त त्याच्याकडेच सरळ बघायला लावते. काहीतरी कृती करायला उद्युक्त करते. पण दुसरे काहीही करण्याची मुभा ठेवत नाही. त्याला कुणाला सांगता येणार नाही, असा त्रास भोगायला लावते.

यापासून बचाव करण्यासाठी, इव्हान कुणाकडून तरी सांत्वनाची अपेक्षा करतो --- नवीन गोष्टी --- त्याला दिलासा देत आहेत असे वाटणाऱ्या नवीन गोष्टी शोधल्या जातात. पण लवकरच त्यांचा चुराडा होतो. त्यातून काही निष्पन्न होत नाही.

या शेवटच्या दिवसांमध्ये, तो त्याने सजवलेल्या व जिथे तो पडला, [ आता ते फारच मूर्खपणाचे वाटते. ] त्या हॉलमध्ये जातो. त्याने त्याचे आयुष्य त्यावर कुर्बान केलेले असते --- त्याला माहिती असते, की तेव्हापासून त्याचे आजारपण सुरु झाले. छान पॉलिश केलेल्या टेबलाला चरे गेलेले त्याला

दिसतात. त्याचे कारण शोधल्यावर त्याला असे आढळते, की एका अल्बमच्या ब्रॉन्झची वाकलेली सुशोभित कडा त्याला लागली आहे. त्याने तो महाग अल्बम विकत घेतलेला असतो. मुलगी व तिच्या मैत्रीणींच्या गलथानपणाबद्दल त्याला समस्या वाटते. अल्बम इथेतिथे फाटलेला असतो. काही फोटो उलटेपालटे झालेले असतात. तो ते काळजीपूर्वक नीट लावून खोलीच्या कोपऱ्यातील झाडांजवळ ठेवतो. तो नोकराला बोलावेल. पण त्याची बायको आणि मुलगी येऊन, त्याला मदत करतील. त्या ऐकणार नाहीत. त्याची बायको त्याच्यावर विश्वास ठेवणार नाही. तो भांडेल व रागावेल. पण ते ठीक होते. त्यानंतर तो त्याबद्दल विचार करणार नाही. नंतर ते अदृष्य होते.

पण नंतर तो स्वतः काही हलवत होता, तेव्हा त्याची बायको म्हणेल, "ते नोकरांना करू दे. तुला परत लागेल. अचानक ते पडद्यावर दिसू लागेल आणि तो ते बघेल. ते क्षणार्धच दिसेल. त्याला आशा वाटेल की ते दिसेनासे होईल. पण नकळत तो त्याच्या कुशीकडे लक्ष देईल. तिथे ते असेलच. तसेच वेदनेने ठुसठुसत असेल!" त्याला ते विसरता येणार नाही. पण फुलांच्या आडून बघतांना, त्याला ते ठळकपणे दिसेल. "हे सर्व कशासाठी?"

“हे खरेच असे आहे. त्या पडद्यापायी जिंकता जिंकता, मी माझे आयुष्य गमावले असते. हे शक्य होते का? किती भयंकर व किती मूर्खपणाचे! हे खरे नसेल. ते शक्य नाही. पण तसे आहे.”

त्याच्या अभ्यासिकेत कसे जायचे? झोप. परत एकटा रहा.

त्या दुखण्याला समोरासमोर तोंड दे. त्याला काही करता येणार नाही. फक्त त्याच्याकडे बघायचे आणि भीतीने गठडी वळून घ्यायची.

## सात

हे कसे झाले, हे सांगणे अशक्य आहे कारण ते नकळत पायरीपायरीने झाले. इव्हानच्या आजारपणाच्या तिसऱ्या महिन्यात, त्याची बायको, त्याची मुलगी, त्याचा मुलगा, त्याचे ओळखीचे लोक, डॉक्टर्स, नोकर आणि तो स्वतः या सर्वांना माहिती होते की लोकांना त्याच्यामध्ये रुची एवढ्यासाठी आहे, की तो लवकरच त्याची कार्यालयातील जागा खाली करेल आणि जिवंत लोकांना त्याच्यामुळे होणाऱ्या त्रासापासून तो त्यांची सुटका करेल व स्वतःचीदेखील त्रासापासून सुटका करेल.

त्याची झोप कमी कमी होऊ लागली. त्याला गुंगी येण्यासाठी ओपियमची व हायपोडर्मिकची इंजेक्शने देण्यात आली. पण त्याने काही फरक पडला नाही. तो उदास मरगळीचा अनुभव घेत होता. सततच्या झोपाळू अवस्थेने त्याला पहिल्यांदा नवीन असल्यासारखा थोडा आरामाचा अनुभव आला. पण नंतर वेदना वाढल्याच.

डॉक्टरांच्या सांगण्यावरुन त्याच्यासाठी वेगळे जेवण तयार केले जाऊ लागले. पण दिवसेंदिवस ते त्याला बेचव व नकोसे वाटू लागले.

त्याच्या मलमूत्रविसर्जनासाठीदेखील वेगळी व्यवस्था करण्यात आली. पण त्यामुळे प्रत्येक वेळी त्याचा छळ होई --- अस्वच्छता, वाईट वास, दुसऱ्या माणसाचा त्यातील सहभाग, यामुळे त्याचा छळ होई.

पण या दुःखदायक गोष्टींमुळे इव्हानला थोडा आराम मिळे. स्वयंपाक्याचा तरुण सहकारी, गेरासीम हा शहरातील अन्नावर वाढलेला स्वच्छ, आनंदी व तरतरीत असलेला शेतकऱ्याचा मुलगा होता. स्वच्छ रशियन कपडे घातलेल्या त्याचे पहिले दर्शन व त्याला करावे लागणारे घाणेरडे काम, यामुळे इव्हानला लाजल्यासारखे होई.

एकदा कमोडमधून उठल्यावर, स्वच्छता करण्यासाठी पँट वर घेतांना, तो बाहेर येऊन हातवाल्या मऊ खुर्चीत पडला. त्याने घाबरून भीतीने स्वतःच्या स्नायू प्रकर्षाने दिसणाऱ्या अशक्त मांडीकडे पाहिले.

गेरॅसीम त्याच्या भक्कम हळू चालीने, त्याच्या जड बुटांमधून खडी आणि ताज्या हिवाळ्याचा वास दरवळत, जाड्याभरड्या कापडाचा ॲप्रन घालून, त्याच्या तरुण दंडांवर त्याच्या डिझाइनच्या शर्टाच्या बाह्या दुमडून, त्याच्या आजारी

मालकाकडे, त्यांच्या भावना समजून बघायचे टाळत, त्याच्या चेहऱ्यावर आनंद झळकवत, कमोडकडे गेला.

क्षीण आवाजात इव्हान बोलला, "गेरॅसीम"

गेरॅसीमला वाटले त्याने मूर्खासारखी काही चूक केली आहे की काय म्हणून तो निघाला. भरभर हालचाल करत त्याने त्याचा ताजा, दयाळु, साधा नुकतीच दाढी फुटू लागलेला चेहरा वळवला.

"काय सर?"

हे तुला फार नकोसे वाटेल. तू मला क्षमा केली पाहिजेस. माझा नाईलाज आहे."

गेरॅसीम त्याचे चकाकणारे पांढरे दात दाखवत म्हणाला, "ओहो, काय सर, त्यात काय त्रास आहे? तुम्ही आजारी असल्याने असे होते आहे."

त्याच्या बळकट, सफाईदार हातांनी त्याचे सवयीचे काम केले व सावकाश पाऊले टाकत, तो खोलीबाहेर पडला. पाच मिनिटांनी तसाच परत आत आला.

इव्हान अजून त्याच अवस्थेत हातवाल्या खुर्चीत बसलेला होता.

गेरॅसीमने नुकतीच घासलेली भांडी बदलली, तेव्हा इव्हानने हाक मारली, “गेरॅसीम, कृपया इथे येऊन मला मदत कर. मला उचल. मला उठता येत नाही आहे. दिमित्रीला बाहेर पाठव.”

गेरॅसीम त्याच्याजवळ गेला. त्याच्या बळकट बाहूंनी चपळपणे व अलगदपणे मालकाला, तो ज्या तऱ्हेने आला तसेच पकडले. एका हाताने त्याला आधार दिला. दुसऱ्या हाताने त्याची पँट वर करून बक्कल लावले व त्याला बसवले. पण इव्हानने त्याला सोफ्यावर झोपवायला सांगितले. गेरॅसीमने सहजपणे व जास्त सायास न करता जवळजवळ त्याला उचलून, सोफ्यावर ठेवले.

“किती सहजतेने आणि चांगल्या पद्धतीने तू ते केलेस!”

गेरॅसीम परत हसला आणि खोलीबाहेर पडण्यासाठी वळला. पण गेरॅसीमच्या आस्तित्वामुळे इव्हानला इतके आरामशीर वाटत होते, की त्याला तो खोलीबाहेर जायला नको होता.

“अजून एक गोष्ट, कृपया खुर्ची वर घे. नाही --- माझ्या पायाखालची. माझे पाय वर असतात, तेव्हा मला सोपे पडते.”

गेरॅसीमने खुर्ची आणून हळूच जागेवर ठेवली व इव्हानचे पाय उचलून त्यावर ठेवले. गेरॅसीम त्याचे पाय उचलत असतांना, इव्हानला बरे वाटत होते.

“माझे पाय वर असतात, तेव्हा मला बरे वाटते. त्याखाली गादी ठेव.”

गेरॅसीमने तसे केले. पुन्हा पाय उचलून त्याखाली गादी ठेवली. पुन्हा पाय उचलले गेल्यावर इव्हानला बरे वाटले. पाय खाली ठेवल्यावर इव्हानला कष्ट होऊ लागले.

गेरॅसीम, तुला आता काही काम आहे का?”

“मुळीच नाही, सर.” गावातील लोकांकडून सभ्य माणसांशी कसे बोलावे, हे गेरॅसीम शिकला होता.

“तुला अजून काय करायचे आहे?”

“काय करायचे आहे? फक्त उद्यासाठी लाकडे फोडायची राहिली आहेत.”

“मग माझे पाय थोडे वर धर. धरतोस का?”

“अर्थात सर. का नाही?” आणि गेरॅसीमने मालकाचे पाय वर धरले. त्या अवस्थेत अजिबात वेदना होत नसल्याचे इव्हानच्या लक्षात आले.

“पण लाकडांचे काय?’

“त्याची काळजी करू नका. अजून पुष्कळ वेळ आहे.”

इव्हानने गेरॅसीमला खाली बसवून स्वतःचे पाय वर धरायला लावले. तो त्याच्याशी बोलू लागला. गेरॅसीमने पाय वर धरलेले असतांना त्याला बरे वाटू लागले.

नंतर इव्हान कधीकधी गेरॅसीमला त्याच्या खांद्यावर आपले पाय ठेवायला सांगे व त्याच्याशी बोलत राही. गेरॅसीम ते आनंदाने, सहजतेने साधेपणाने व चांगल्या स्वभावाने करे. त्यामुळे इव्हानचे हृदय भरून येई. दुसऱ्या लोकांचे आरोग्य, शक्ती व ताजगी त्याच्यासाठी उदास करणारी असे. पण गेरॅसीमची शक्ती व स्फूर्ती त्याला उदास न करता, उलट शांत करे.

इव्हानला सर्वात कसला त्रास होत असे तर खोटेपणाचा! काही कारणाने सर्वांनी असे मान्य केले होते, की तो मरायला टेकलेला नसून, फक्त आजारी आहे. त्याला औषधे व काही उपचारांची जरुरी आहे व मग तो बरा होईल. पण त्याला माहिती होते, की काहीही केले तरी तो बरा होणार नाही. अजून अजून जास्त त्रास आणि मग मरण, हेच होणे अटळ आहे. या फसवणुकीचा त्याला त्रास होई --- की त्याना जे सर्व माहिती आहे व त्याला जे माहिती आहे, ते मान्य न करणे! त्याच्या

भयंकर परिस्थितीविषयी खोटे बोलणे व त्या खोट्यात त्यालाही सहभागी करून घेणे! ते खोटे --- त्याच्या मरणाच्या दिवशी, संध्याकाळीदेखील त्याच्यावर स्वार होते. त्यांचे पडदे, त्यांच्या भेटी, जेवणासाठी बनवलेला स्टर्जन मासा, यामुळे त्याचे भीतीदायक एकाकीपण खच्ची केले जात होते. त्यामुळे इव्हानला फार दुःख होत होते. विचित्रपणे खूप वेळा, ते जेव्हा मूर्खासारखे वागत, तेव्हा तो असे बोलण्याच्या कडेवर येऊन ठेपे, "खोटे बोलू नका. तुम्हाला व मलाही माहिती आहे, की मी मरतो आहे. त्यामुळे त्याबद्दल खोटे बोलणे बंद करा." पण हे प्रत्यक्ष बोलण्याचा त्याला धीर होत नसे. त्याच्या मरणातील भयानक भीतीदायक बाब ही होती, त्याच्या आसपास त्याला दिसे की, वरवर दुःखी व चुकीचे प्रसंग [ जसे काही कुणीतरी हॉलमध्ये शिरतांना, नकोसा वास पसरवत आहे. ] आणि हे त्याने आयुष्यभर अनुभवलेल्या सजलेल्या पद्धतीने केले जात असे. कुणालाच त्याचे काही पडले नसल्याचे, त्याला जाणवे. कारण त्याचे नोकरीतले पद मिळवायची कुणाचीही इच्छा नव्हती. फक्त गेरॅसीमने त्याला ओळखले व त्याला त्याच्या मालकाची दया येई. त्यामुळे इव्हानला फक्त त्याच्याबरोबर मोकळेपणा वाटत असे. गेरॅसीम त्याचे पाय उचले, तेव्हा त्याला आराम मिळे. [ कधीकधी रात्रभर ] गेरॅसीम झोपायला जायला नकार देई. तो

म्हणे, “काळजी करू नका. मला नंतर पुरेशी झोप मिळेल.” किंवा तो अचानक ओळखीचा झाला व ओरडला, “जर तुम्ही आजारी नसतात, तर गोष्ट वेगळी होती. पण तुम्ही आजारी आहात, तर थोडा त्रास झाल्यास मी कुरकुर का करावी?” गेरॅसीम एकटा खोटे बोलत नसे. प्रत्येक गोष्टीवरून असे दिसे आणि ते लपवायची त्याला गरज वाटत नसे. त्याला एकट्यालाच इव्हानच्या केसबद्दल सर्व कळत असे. फक्त त्याच्या अती बारीक व अशक्त झालेल्या मालकाबद्दल त्याला वाईट वाटे. एकदा जेव्हा इव्हान त्याला लांब पाठवत होता, तेव्हा तो सरळ बोलला, “आपण सगळे मरणार आहोत. तेव्हा थोडासा त्रास झाल्यास, मी आरडाओरडा का करावा?” त्याला त्याचे काम म्हणजे ओझे वाटत नसल्याचे, यावरून सिद्ध होत होते. कारण तो एका मृत्यूशय्येवर असलेल्या माणसासाठी काम करत होता. आणि तो स्वतः जेव्हा मरायला टेकेल, तेव्हा त्याच्यासाठी पण असेच काम कोणीतरी करेल.

इव्हानला सर्वात वाईट कसले वाटे, तर कोणाला त्याची दया येत नसे. काही वेळा फार त्रास सहन केल्यावर, त्याला सर्वात [जरी त्याला कबूल करायला लाज वाटली तरी ] जास्त असे वाटे की एखाद्या आजारी मुलासारखी त्याची काळजी घेतली जावी.

आपलयावर दया केली जावी व आपले दुःख कमी केले जावे, यासाठी तो तरसे. त्याला माहिती होते की तो महत्वाचे काम करणारा होता व त्याची दाढी करडी होऊ लागली होती, त्यामुळे त्याची अपेक्षा पुरी होणे अवघड होते. पण तरीही त्याची तशी फार इच्छा असे. गेरॅसीमचा त्याच्याबद्दलचा दृष्टीकोन काहीसा त्याला हवाहवासा वाटणारा होता, त्यामुळे त्याला समाधान लाभे. इव्हानला रडू येई. कुणी आपल्याला थोपटावे व आपल्यासाठी रडावे, असे वाटे. मग त्याचा मित्र शेबेक येई आणि त्याला थोपटण्याऐवजी व त्याच्यासाठी रडण्याऐवजी, दुसरेच काही करे. इव्हान कडकपणे खोलवर गंभीर होई व सवयीच्या रेट्यामुळे, अठराव्या शतकातील कोर्टाच्या एखाद्या निर्णयावर त्याचे मत प्रगट करे व हट्टीपणे त्याचा मुद्दा लावून धरे. त्याच्या शेवटच्या दिवसात, हा त्याच्यातील व त्याच्या भोवतालचा खोटेपणा त्याला विषासारखा डसे.

# आठ

ती सकाळ होती.

ते त्याला माहिती होते, कारण गेरॅसीम गेला होता आणि पीटर नावाचा नोकर आला होता. त्याने मेणबत्त्या विझवल्या. एक पडदा गुंडाळला व मुकाट्याने स्वच्छतेला सुरवात केली. सकाळ असो वा संध्याकाळ, शुक्रवार असो वा रविवार, त्यात काही फरक पडत नसे. ते तसेच असे. गंभीर व सतत ठुसठुसणारी वेदना, क्षणभरही न थांबणारे दुखणे, थांबत जाणारी पण न विझलेली जीवनाची जाणीव! द्वेषपूर्ण व भीतीदायक मरण, हे एकमेव सत्य असणे! नेहमीच खोटेपणा! अशा परिस्थितीत दिवस काय, आठवडे काय आणि तास काय, सर्व सारखेच नाही का?

“तुम्ही थोडा चहा घेणार का, सर?”

इव्हानने विचार केला, ‘त्याला सर्व गोष्टी वेळेवर व सुरळीत व्हायला हव्या असतात. आणि सकाळी लोकांनी चहा प्यावा, असे त्याला वाटते.’ आणि तरी तो “नाही” म्हणाला.

“सर, तुम्हाला सोफ्यावर जायला आवडणार नाही का?”

‘त्याला खोलीची आवराआवरी करायची आहे आणि मी मध्ये येतो आहे.’ असा विचार करत तो म्हणाला, “नाही. मला एकट्याला राहू दे.”

तो मनुष्य घाईने आसपास जोरात चालत गेला. इव्हानने हात ताणले. मदत करायच्या तयारीने पीटर आला.

“सर, काय झाले?”

“माझे घड्याळ.”

त्याच्या हाताजवळ असलेले घड्याळ पीटरने घेतले व मालकाला दिले.

“साडेआठ झाले. ते आले का?’

“नाही सर, फक्त वाल्दिमिर ईव्हानोविच [ मुलगा ] आला आहे पण तो शाळेला गेला आहे. तुम्ही जर बोलावले तर बाईसाहेबांनी [ प्रॅस्कोव्हयाने ] मला त्यांना उठवायला सांगितले आहे. मी तसे करू का?”

“नाही. त्याची काही गरज नाही.” पण थोडा चहा घेतला तर बरे’ असा विचार करून, तो म्हणाला, “हो. मला थोडा चहा आण.”

पीटर दाराकडे गेला. पण एकटा राहिल्याने इव्हान घाबरला. “मी त्याला इथे कसे ठेऊन घेऊ शकेन? हो. हो. माझे औषध.”

“पीटर मला माझे औषध दे.”

“का नाही? त्यामुळे कदाचित तुम्हाला बरे वाटेल. त्याने चमचाभर औषध घेऊन गिळून टाकले. त्याला ओळखीची, आजारी, बेकार चव जाणवल्यावर तो म्हणाला, “नाही. त्याने काही होणार नाही. ते मूर्खपणाचे आहे. फसवे आहे. मी त्यावर विश्वास ठेऊ शकत नाही. पण मग वेदना, त्या का बरे होत आहेत? जर त्या निदान क्षणभर जरी थांबल्या तर!” तो कण्हला. पीटर त्याच्याकडे गेला. इव्हान बोलला, “ठीक आहे. जा. माझ्यासाठी चहा घेऊन ये.”

पीटर गेला. इव्हान मनातून उद्भवलेल्या भयंकर विचारांनी, वेदनांपेक्षा जास्त तळमळू लागला. सतत, नेहमी तेवढ्याच, नेहमीच असे न संपणारे दिवस व रात्री. जर ते लवकर आले तर! काय लवकर आले तर? मरण, अंधार --- नाही. नाही. मरणापेक्षा दुसरे काहीही!

जेव्हा ट्रेमध्ये चहा घेऊन, पीटर आला, तेव्हा गोंधळून, तो कोण आहे आणि त्याने काय आणले आहे, ते न कळून, इव्हान

त्याच्याकडे टक लाऊन बघू लागला. त्या नजरेने पीटर बावरून गेला. आणि त्याच्या या प्रतिक्रियेमुळे, इव्हान भानावर आला.

“ओहो, चहा! ठीक आहे, खाली ठेव. मला हात धुवायला व स्वच्छ शर्ट घालायला मदत कर.”

आणि इव्हान हात धुऊ लागला. मध्येमध्ये विश्रांती घेत, आधी त्याने हात धुतले, मग चेहरा व दात धुतले. केस विंचरले व आरशात बघितले. त्याला जे दिसले, ते बघून तो घाबरला. विशेषतः त्याच्या आजारपणाने अशक्त झालेल्या कपाळावर ते मोठ्या मुश्किलीने कडक होऊन उभे राहिलेले केस बघून, तो घाबरला.

त्याचा शर्ट बदलला जात असतांना, त्याला माहिती होते, की त्याला त्याचे शरीर बघून अजून भीती वाटणार आहे. त्यामुळे त्याने त्याकडे बघायचे टाळले. शेवटी तो तयार झाला. त्याने चौकडीचा शर्ट घातला. गाऊन ओढून घेतला आणि हातवाल्या खुर्चीत, चहा पिण्यासाठी बसला. क्षणभर त्याला ताजेतवाने वाटले. पण चहा पितांना, पुन्हा तीच नकोशी चव लागू लागली व परत वेदना होऊ लागल्या. मोठ्या प्रयत्नाने त्याने तो संपवला. मग तो पाय ताणून पडला व पीटरला जायला सांगितले.

नेहमीप्रमाणे आशेचा किरण चमकला. मग दुःखाचा समुद्र उसळला. नेहमीच वेदना. नेहमीच दुःख. नेहमी तसेच! कोणाला तरी हाक मारायची भयानक इच्छा त्याला झाली. पण त्यापूर्वीच त्याला समजले की इतरांच्या उपस्थितीत, ते अजूनच वाढेल. “जाणीव विसरण्यासाठी ---गुंगीच्या औषधाचा दुसरा डोस. मला डॉक्टरांना सांगायला हवे, की त्यांनी दुसरा काही विचार करावा. अशी अवस्था सहन करणे, अशक्य आहे.”

एक तास व अजून एक तास तसाच गेला. पण आता दाराची घंटी वाजली. कदाचित डॉक्टर आले असतील का? हो. ताजेतवाने, दयाळू, जाडसर व आनंदी असे ते, त्यांच्या चेहऱ्यावर असा भाव घेऊन आले, की, “तुम्हाला कसले तरी दुःख होत आहे. पण आपण लवकरच ते दूर करू.”

डॉक्टरांना माहिती आहे, की असे म्हणणे खरे तर अप्रस्तुत आहे. पण ते तसे म्हणून बसले व मग काही करता येईना.

डॉक्टर दिलासा देत जोरजोरात त्यांचे हात चोळतात.

“बापरे, किती गार आहे! इतके दाट धुके पडले आहे. मला उब मिळवू द्या.” ते म्हणाले. जसे काही उब मिळेपर्यंत थांबून, मग ते सर्व काही चांगले करणार आहेत.

“ठीक आहे, आता तुम्ही कसे आहात?

इव्हानला वाटले की डॉक्टरांना असे म्हणायचे आहे, की “कसे वाटते आहे?” पण याने काम भागणार नाही त्यामुळे त्याऐवजी, ते म्हणतात, “तुमची रात्र कशी गेली?”

इव्हान त्यांच्याकडे बघत म्हणतो, “तुम्हाला खरोखरच कधी खोटे बोलायची लाज वाटत नाही का?” पण डॉक्टरांना प्रश्न समजून घ्यायचा नाही आहे. इव्हान म्हणतो, “नेहमीसारखीच भयंकर गेली. वेदना मला कधीच सोडत नाही व कमीही होत नाही. जर काही वेगळे --- “

“हो. तुम्ही आजारी माणसे नेहमी अशीच असता --- आता मला वाटते, मी पुरेसा उबदार झालो आहे. अगदी कडक शिस्तीच्या प्रॅस्कोव्हयाला सुद्धा माझ्या तापमानात काही चूक वाटत नाही आहे. तर आता मी शुभ प्रभात म्हणतो.” एवढे बोलून डॉक्टर रुग्णाचा हात दाबतात.

मग त्यांचा पहिला खेळकरपणा सोडून, ते मोठ्या गंभीर चेहऱ्याने रुग्णाला तपासायला लागतात. नाडी बघून व तापमान मोजून, मग ते स्टेथॅस्कोपने शरीराचे ठोके ऐकू लागतात.

इव्हानला हे चांगले व नक्की माहिती आहे, की हा सगळा विनोद आहे व पूर्ण फसवणूक आहे. पण जेव्हा डॉक्टर गुडघे टेकून, वाकून, पहिल्यांदा कान देऊन व मग दुर्लक्ष करून, व चेहऱ्यावरचे हावभाव बदलत, निरनिराळ्या प्रकारच्या शारीरिक सुसूत्र हालचाली करतात, तेव्हा इव्हान जसा वकिलांचे भाषण खोटे आहे हे माहिती असून व ते तसे का करत आहेत हे माहिती असून, त्यांच्या भाषणांना शरण जातो, तसेच या बाबतीतही होते.

सोफ्यावर गुडघे दुमडून बसून, डॉक्टर इव्हानला तपासत असतांना, प्रॅस्कोव्हयाच्या रेशमी वस्त्रांची सळसळ दाराशी ऐकू येते. ती डॉक्टर आलेले न सांगितल्याबद्दल पीटरला ओरडत असते.

ती आत येऊन तिच्या नवऱ्याचे चुंबन घेते आणि लगेच हे सिद्ध करू बघते, की आधीच तिथे खूप वेळापासून असते. पण काही गैरसमजातून डॉक्टर तिथे येतात तेव्हा नेमकी नसते.

इव्हान तिच्याकडे बघतो. तिला निरखतो. तिच्या दिखाऊपणाबद्दल, नटण्याथटण्याबद्दल, स्वच्छ मानेबद्दल व हातांबद्दल, तिच्या रेशमी केसांच्याबद्दल आणि डोळ्यांच्या चमकदार आकर्षकतेबद्दल, नाक मुरडतो त्याला मनापासून त्या

गोष्टींचा तिरस्कार वाटतो. त्या तिरस्कारामुळे तिचा स्पर्श त्याला टोचतो.

त्याच्याबद्दलचा व त्याच्या आजारपणाबद्दलचा तिचा दृष्टीकोन अजून तसाच आहे. तो दृष्टीकोन तो दूर घालवून देऊ शकत नाही. मात्र डॉक्टरांनी त्याच्याबरोबर नातेसंबंध प्रस्थापित केला आहे. तसाच तिनेही प्रस्थापित केला आहे --- जसे की त्याने करायला पाहिजे, ते तो करत नव्हता आणि त्यासाठी त्यालाच दोष द्यायला हवा. ते तिने प्रेमाने त्याला सांगितले --- आणि आता ती तिचा तो दृष्टीकोन बदलू शकत नव्हती.

"तुम्हाला माहिती आहे का, की तो माझे ऐकत नाही व त्याची औषधे वेळेवर घेत नाही. सर्वात कडी म्हणजे, तो त्याच्यासाठी योग्य नसलेल्या स्थितीत, त्याचे पाय वर करून झोपतो."

त्याने गेरॅसीमला कसे त्याचे पाय वर धरून उभे रहायला लावले, ते तिने वर्णन करून सांगितले.

डॉक्टर तिरस्कारयुक्त मित्रत्वाने हसले व म्हणाले, "काय करावे? आजारी लोकांच्या अशा मूर्खासारख्या इच्छा असतात. पण आपण त्यांना माफ केले पाहिजे.

तपासणी संपल्यावर डॉक्टरांनी घड्याळाकडे बघितले. मग प्रॅस्कोव्हयाने इव्हानला सांगितले की त्याची परवानगी असेल, तर आज तिने एका नावाजलेल्या विशेष डॉक्टरला त्याला तपासण्यासाठी बोलावले आहे. ते डॉक्टर त्याला तपासून मायकेल [ त्यांच्या नेहमीचा डॉक्टर ] बरोबर चर्चा करून उपचारांची दिशा ठरवतील.

त्याला ती हे सर्व त्याच्यासाठी करते आहे, असे वाटावे म्हणून विरोधभासात्मक रीत्या कडकपणे ती म्हणते, "कृपया यात काही खोडा घालू नको. हे मी माझ्यासाठी करते आहे." त्याच्या भुवया ताणून, तो शांत राहिला. त्याला असे वाटले की त्याच्याभोवती खोटे जाळे विणले गेले आहे. काहीही शोधून काढणे अवघड आहे.

ती त्याच्याकरता जे करे, ते सर्व तिच्यासाठी असे. तिने त्याला सांगितले की खरे तर ती करते आहे, ते सर्व तिच्यासाठीच करते आहे. जसे काही ते इतके अविश्वासार्ह आहे, की त्याला नेमके उलटे वाटावे.

साडेअकरा वाजता, नावाजलेला विशेष डॉक्टर आला. जीवनमरणाची ज्वलंत समस्या त्याच्यापुढे ठाकलेली असतांना परत दुसऱ्या खोलीत, मूत्रपिंड व आंत्रपुच्छ तपासणी, विशिष्ट

संभाषण व प्रश्नोत्तरे अगदी महत्वाची असल्याच्या थाटात सुरु झाली. मूत्रपिंड व आंत्रपुच्छ त्यांचे कार्य नीट करत नव्हते. आता तो नवीन डॉक्टर व डॉक्टर मायकेल हे दोघे मिळून बचावाचा काही मार्ग धुंडाळू लागले.

नवीन डॉक्टरने गंभीर पण आशा असलेला चेहरा दाखवत, भीती आणि आशा यांचे मिश्रण असलेल्या इव्हानच्या डोळयातील घाबरट प्रश्नाला उत्तर दिले. हे दुखणे बरे होण्याची काही आशा आहे का, असे इव्हानने विचारल्यावर ते म्हणाले, की असे ते ठामपणे सांगू शकणार नाहीत. पण तशी शक्यता आहे. डोळयात आशा असलेली इव्हानची डॉक्टरांकडे लागलेली नजर इतकी दया येईल अशी होती, की प्रॅस्कोव्हयाला ती पाहून डॉक्टरांची फी देण्यासाठी बाहेर जातांना डोळयात पाणी आले.

डॉक्टरांनी दाखवलेला आशेचा किरण व दिलेले प्रोत्साहन फार काळ टिकले नाही. तीच खोली, तीच चित्रे, तेच पडदे, तोच भिंतीचा कागद व त्याच औषधांच्या बाटल्या, हे सर्व तिथे होते आणि तेच ते त्रासलेले शरीर! इव्हानने शोक करायला सुरवात केली. त्यांनी त्याला कातडीखाली इंजेक्शन दिले. तो बेशुद्ध झाला.

तो शुद्धीवर आला, तेव्हा संध्याकाळ झाली होती. त्यांनी इव्हानसाठी जेवण आणले व मोठ्या प्रयासाने त्याला बिफचा थोडा चहा प्यायला लावला. सर्व नेहमीसारखेच झाले. रात्र पडायला लागली होती.

सात वाजता, जेवणानंतर संध्याकाळच्या कपड्यात प्रॅस्कोव्हया खोलीत आली. तिच्या घट्ट अंतर्वस्त्रांनी तिची छाती उठून दिसत होती व चेहऱ्यावर कुठेकुठे पावडर राहिली होती. तिने सकाळी त्याला आठवण केली होती, की ते थिएटरमध्ये जात आहेत. सारा बर्नहार्ड गावाला भेट देणार होती व त्यांनी बॉक्सची तिकिटे काढली होती. त्यानेच त्यासाठी आग्रह केला होता. आता तो ते विसरला होता. तिचा नखरा त्याला उदास करत होता. पण तेही तो विसरून गेला. त्यानेच त्याना बॉक्सची तिकिटे काढायला लावली होती, हे आठवून, त्याने त्याचा राग आवरला. मुलांसाठी तो सौदर्यरसग्रहणात्मक दृष्ट्या शिकावा, असा अनुभव ठरणार होता.

स्वतःवर खूश असलेली परंतु थोडे अपराधी वाटणारी प्रॅस्कोव्हया आत आली. तिने बसून त्याची खुशाली विचारली. पण त्याला ते वरवरचेच विचारणे वाटले. ते खरे नव्हते. सांगण्यासारखे काही नसणार, हे माहितीच होते --- मग तिला खरे

काय सांगायचे होते, त्याकडे ती वळली: ती खरे तर कुठल्याही कारणाने गेली नसती, पण बॉक्सची तिकिटे काढली होती. हेलन व त्यांची मुलगी चालल्या होत्या. पेत्रीस्चेव्ह [ तपासणी दंडाधिकारी, त्यांच्या मुलीचा वाग्दत्त वर ] देखील चालला होता. त्यामुळे त्याना एकट्यांना जाऊ देणे शक्य नव्हते. तिने तिथे थोडा वेळ जाणेच पसंत केले असते. ती घरी नसतांना त्याने डॉक्टरांनी सांगितलेले औषध वेळेवर घ्यावे, असे ती बोलली.

“हो, आणि फेडोर पेट्रोव्हीच [ आर्थिक व्यवहार बघणारा ] व लिसा यांना इथे यायचे आहे. त्यांना येऊ दे का?”

“ठीक आहे.”

पूर्ण संध्याकाळच्या पोशाखात मुलगी आली तिच्या ताज्या तरुण बळकट, सुदृढ आणि प्रेमात पडलेल्या शरीराच्या प्रदर्शनाने [ शरीराचा तो भाग, जो त्याला फार त्रास देत असे. ] त्याच्या खूप आजारी व वेदना होणाऱ्या मरणप्राय शरीराचा विरोधाभास उठून दिसला.

संध्याकाळचे कपडे घालून फेडोर पेट्रोव्हीच पण आला. त्याचे केस ला कॅपोल [ फ्रेन्च गायक ] सारखे कुरळे होते. त्याच्या पिळदार लांब मानेभोवती कडक कॉलर चिकटून बसली

होती. त्याने मोठा पांढरा शर्ट घातला होता व निमुळती काळी पँट त्याच्या मजबूत मांड्यांभोवती घट्ट बसली होती. त्याने एक घट्ट बसणारा पांढरा मोजा घातला होता व टोपी हातात धरली होती.

त्याच्यापाठोपाठ नवीन गणवेष व मोजे घातलेला गरीब बिचारा शाळेतील मुलगा हळूच सरपटत आला होता. त्याच्या डोळयांखाली भयानक सावल्या दिसत होत्या. त्याचा अर्थ इव्हानला चांगला माहिती होता.

त्याचा मुलगा त्याला नेहमी दयनीय वाटे. आताही त्याचे दया येईल असे घाबरलेले रूप भयंकर दिसत होते. इव्हानला वाटले, की गेरॅसीमजवळ उभा असलेला वास्या [ मुलगा ] फक्त त्याला समजून घेतो आहे व त्याच्यावर दया दाखवतो आहे.

ते सगळे बसले व त्याच्या तब्येतीची चौकशी करू लागले. शांतता पसरली. लिसाने तिच्या आईला नाटक बघतांना घालायच्या चष्म्याबद्दल विचारले. चष्मा कुणी घेतला व कुठे ठेवला यावरून आई व मुलीमध्ये वाद झाला. त्यामुळे थोडा ताण तयार झाला.

फेडोर पेट्रोव्हीचने इव्हानची चौकशी करतांना, त्याने सारा बर्नहारड्टला पाहिले का असे विचारले. इव्हानला प्रथम प्रश्न

समजला नाही. पण नंतर तो उत्तरला, “नाही तू तिला यापूर्वी पाहिलेस का?”

“हो. ॲड्रीएन लेकोव्हरर इथे पाहिले.”

सारा बर्नहारड्टने केलेल्या काही चांगल्या भूमिकांची नावे प्रॅस्कोव्हयाने सांगितली. तिच्या मुलीने त्याला हरकत घेतली. संभाषण तिच्या अभिनयाच्या डौलदारपणावर व खरे वाटण्यावर घसरले --- असे संभाषण जे नेहमी परत परत केले जाते आणि ते तेच असते.

संभाषणाच्यामध्ये फेडोरने इव्हानकडे पाहिले व तो स्तब्ध झाला. इव्हान विस्फारलेल्या डोळ्यांनी, सरळ बघत होता. प्रसंगापरत्वे त्यात राग दिसत होता. हे दुरुस्त करायला हवे होते, पण ते अशक्य होते. शांतता नष्ट करायला हवी होती. पण सर्वजण आपले खोटे बोलण्याचे बिंग अचानक फुटेल, म्हणून घाबरत होते. लिसाने पहिल्यांदा धाडस केले. पण सगळ्यांना जे वाटत होते, ते लपवताना, तिने इव्हानला फसवले.

तिच्या वडिलांनी तिला भेट म्हणून दिलेल्या घड्याळ्यात बघत व फेडोरकडे बघून फक्त त्या दोघांनाच माहिती असलेले काही आठवत, स्मितहास्य करत, ती म्हणाली, आपल्याला

जायचे असेल, तर आता निघायला हवे.” ती तिच्या वस्त्रांची सळसळ करत उठली.

ते सगळे उठले. शुभ रात्री म्हणून निघून गेले.

ते गेले तेव्हा, इव्हानला असे वाटले, की थोडे बरे वाटते आहे. खोटेपणा त्यांच्याबरोबर निघून गेला. पण वेदना राहिलीच --- कमी न होणारी व न वाढणारी, तीच भीती आणि तीच वेदना! सर्व काही एकसुरी!

सगळे बेकार होते.

परत मिनिटानंतर मिनिट व तासानंतर तास जाऊ लागला. सगळे काही तसेच चालू राहिले. त्याला अंत नव्हता. त्याचा अटळ शेवट अधिकाधिक भयाण होऊ लागला.

पीटरने विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देतांना तो बोलला, “हो. गेरॅसीमला इथे पाठवा.”

## नऊ

त्याची बायको रात्री उशीरा आली. ती चोरपावलांनी आली पण त्याला ते समजले. त्याने डोळे उघडले व परत ते बंद करायची घाई केली. तिला गेरॅसीमला बाहेर पाठवून तिथे त्याच्याजवळ बसायचे होते. पण त्याने डोळे उघडून म्हटले, “नाही. तू निघून जा.”

“तुला खूप वेदना होत आहेत का?”

“नेहमी त्या होत असतातच.”

“थोडे ओपियम घे.”

तो कबूल झाला व थोडे घेतले. ती निघून गेली.

पहाते तीनपर्यंत, तो विचार करायच्या मनस्थितीत नव्हता. त्याला असे वाटत होते की त्याला त्याच्या दुःखाबरोबर, एका अरुंद, काळया, खोल पोत्यात भरून खाली ढकलत आहेत पण त्या पोत्याचा तळ गाठता येत नाही. हे फार भयानक आहे. त्याबरोबर वेदनाही चालू आहेतच. तो घाबरला होता, पण त्याला बाहेर पडायचे होते. तो प्रयत्न करत राहिला.आणि अचानक पोत्यातून तो बाहेर पडला व शुद्धीवर आला. गेरॅसीम अंथरुणाच्या

पायाशी शांतपणे व धीर धरून, पेंगत बसला होता. त्याचे रोड व मोजे घातलेले पाय, तो गेरॅसीमच्या खांद्यावर ठेऊन, झोपला होता. तिथे तीच जळणारी मेणबत्ती होती व उसंत न घेऊ देणारी वेदना!

तो कुजबुजला, "गेरॅसीम, जा."

"ठीक आहे सर, मी काही वेळ थांबतो."

"नाही. जा."

त्याने त्याचे पाय बाजूला घेतले. कुशीवर वळला. त्याला स्वतःची कीव आली. गेरॅसीम पुढच्या खोलीत जाईपर्यंत तो थांबला. नंतर तो एखाद्या मुलासारखा मुसमुसून रडू लागला. त्याच्या अगतिकपणाबद्दल, माणसाचा एकटेपणा व दुष्टावा, देवाची क्रूरता आणि देवाचे आस्तित्व नसणे, हे आठवून तो रडत होता.

"तू हे असे का केलेस? तू मला अशा अवस्थेला का आणलेस? का? का तू माझा असा छळ मांडला आहेस?"

त्याला उत्तराची अपेक्षा नव्हती. तरी तो रडत राहिला कारण याला उत्तर नसल्याचे त्याला माहिती होते. वेदना वाढू लागली.तो स्वतःशी बोलला, "चल आटप. मला एक धक्का दे. पण त्याने

काय होणार? मी तुझे काय घोडे मारले आहे? मला अशी शिक्षा का?"

मग तो शांत झाला. फक्त रडणे थांबवले नाही तर श्वासही रोधून ध्यान लावले. जणू तो काही ऐकू येणारा आवाज ऐकत नव्हता. तर त्याच्या आत्म्याचा आवाज ऐकत होता. त्याच्या आतून उसळणाऱ्या विचारझऱ्याची खळखळ ऐकत होता.

त्याने शब्दांमधील स्पष्ट आवाज ऐकला, "तुला काय हवे आहे?"

तो स्वतःशी परत परत बोलला, "तुला काय हवे आहे? तुला काय हवे आहे?"

तो उत्तरला, "वेदना न होता मला जगायचे आहे."

नंतर परत इतके पूर्ण लक्ष देऊन त्याने ऐकले, की त्याच्या वेदनेचाही त्याला उपसर्ग झाला नाही.

आतला आवाज म्हणाला, "जगायचे? पण कसे?"

"मी पूर्वी जगत होतो तसे --- वेदनेशिवाय, आनंदाने!"

"तू पूर्वी जगत होतास तसा --- वेदनेशिवाय, आनंदाने!" आतील आवाजाने परत तेच शब्द उच्चारले.

आणि कल्पनेने तो त्याच्या आयुष्यातील सर्वात चांगले आनंदी क्षण आठवू लागला. पण विचित्रपणे पूर्वी जे चांगले आनंदी क्षण वाटत होते, तसे ते वाटेनात. पहिले बालपणातील काही क्षण सोडले, तर पुढील कुठलेच क्षण आनंदी वाटेनात. मात्र बालपणातील ते क्षण खरेच खूप छान होते. तसे परत जगायला मिळाले तर! पण ज्या मुलाने ते अनुभवले होते, तो मुलगा आता अस्तित्वात नव्हता. हा जणू दुसऱ्या कुणाचा भूतकाळ होता. आताचा इव्हान समोर आल्यावर, ते आनंदी क्षण त्याच्या डोळ्यांदेखत वितळून गेले आणि त्याची जागा काही कवडीकिंमत असणाऱ्या वाईट क्षणांनी घेतली.

तो बालपणापासून अलग झाला. आता तो वर्तमानकाळातील फुसक्या व आनंदाचा लवलेश नसलेल्या भागाकडे आला. हे कायद्याच्या शाळेपासून सुरु झाले. तिथे काही चांगले सापडले --- तिथे हृदय हलके होते. मित्र होते. आशा होती. पण वरच्या वर्गात हे सर्व कमी कमी होत गेले. मग करीयरच्या सुरवातीला तो जेव्हा सरकारी नोकरीत होता, तेव्हा काही सुखकारक घटना घडल्या. त्या स्त्रीच्या प्रेमासंबंधी होत्या. नंतर सर्व काही गोंधळ झाला. फार काही चांगले झाले नाही. पुढेही तसेच होत गेले. त्याचे लग्न म्हणजे निव्वळ अपघात होता.

मग दोघांचे पटेनासे झाले. त्याच्या बायकोच्या तोंडाला येणारा वाईट वास, ढोंगी स्वभाव, कामजीवनात सुख घेण्याचा अभाव आणि पैशांची अती ओढ हे सर्व एक वर्ष, दोन वर्षे, दहा वर्षे, वीस वर्षे व नेहमी तसेच चालत राहिले. जितकी वर्षे गेली तितके ते वाईट रीत्या वाढू लागले. "मला वाटत होते की मी वरवर चाललो आहे. पण प्रत्यक्षात मी खालीखाली चाललो होतो. लोकांच्या मते मी वर चढत होतो. पण आयुष्य माझ्यापासून फारकत घेत होते. आता सर्व काही झाले. फक्त मरण उरले.

"मग याचा अर्थ काय? का? हे आयुष्य इतके भावनाहीन व भयंकर असू शकत नाही. पण खरेच जर ते तसे असेल, तर मी मरणाला दुःख का मानावे? काहीतरी चुकते आहे."

त्याला अचानक असे वाटले, 'कदाचित जसे जगावे, तसा मी जगलो नसेन. पण असे कसे? तेव्हा मी सगळे योग्य प्रकारे केले, तर मग असे कसे?' त्याने ताबडतोब त्याच्या मनातून हे काढून टाकले. जीवनातील व मृत्यूमधील सर्व कोड्यांची उत्तरे मिळणे अशक्य आहे.

मग आता तुला काय हवे आहे? जगायचे आहे? 'कायद्याच्या कोर्टात शिपाई 'दंडाधिकारी आले' असे ओरडायला लागला की सर्वजण सावरून बसत, तसे तुला

जगायचे आहे का?' त्याने स्वतःशीच म्हटले. 'तो दंडाधिकारी आहे. पण मी अपराधी नाही' त्याने रागाने विचार केला. 'हे कशासाठी आहे?' आणि तो रडू लागला. त्याचा चेहरा भिंतीकडे वळवून, त्याच प्रश्नावर विचार करू लागला. पण उत्तर मिळाले नाही. जेव्हा जेव्हा त्याच्या मनात प्रश्न उठत, आणि तसे नेहमीच होई, तर त्याला असेच वाटे, की आपण जसे जगायला हवे होते, तसे जगलो नाही. तो लगेच त्याच्या आयुष्याच्या बरोबर असण्याचा विचार करू लागे व अशी विचित्र गोष्ट मनातून काढून टाके.

## दहा

अजून पंधरवडा गेला. आता इव्हान सोफा सोडू शकत नव्हता. तो अंथरुणावर न झोपता, सर्व वेळ भिंतीकडे तोंड करून सोफ्यावर पडे. नेहमी त्याला न संपणारी वेदना त्रास देत असे. त्याच्या एकाकीपणाच्या प्रश्नांचे विचार त्याला निरुत्तर करत. “हे काय आहे? हे मरण असावे का?” आतला आवाज उत्तरे, “हो, हे मरण आहे.”

“एवढ्या वेदना कशासाठी?” आणि आतील आवाज उत्तरे, “काही कारणाशिवाय --- त्या तशाच आहेत.” याशिवाय व याहून वेगळे काही नव्हते.

त्याच्या आजारपणाच्या सुरवातीपासून, त्याने डॉक्टरांना भेट देईपर्यंत, इव्हानचे आयुष्य दोन बदलणाऱ्या परस्परविरोधी मनस्थितीचे होते. आता ते न समजणाऱ्या, भयानक मरणकल्पनेने दुःखी होते. केवळ आशा व खोलवर रुचीपूर्ण निरीक्षणावर त्याचे अवयव कार्य करत होते. आता त्याच्या डोळ्यापुढे फक्त नीट कार्य न करणारे मूत्रपिंड, आतडे व ज्यापासून सुटका नाही असे अगम्य भयानक मरण होते.

या आजारपणाच्या सुरवातीपासून असलेल्या दोन बदलणाऱ्या परस्परविरोधी मनस्थितींमध्ये वाढ झाल्यामुळे,

मूत्रपिंडाबद्दलचा व घाबरवून सोडणाऱ्या मरणाबद्दलचा संशय व कल्पनाशक्तीदेखील वाढली होती.

तीन महिन्यांपूर्वी तो काय होता व आता काय झाला आहे, किती ठराविक वेगाने तो खाली खाली चालला आहे. याबद्दलचे विचार त्याच्या मनात सतत येत. त्याच्या मनातील आशेची शक्यता डळमळीत होई.

अलीकडे एकाकीपणात तो सोफ्यावर पहुडलेला असे. गजबजलेल्या शहरात भोवताली अनेक नातेवाईक व ओळखीचे लोक असतांना, त्याला एकाकीच वाटे --- समुद्राच्या तळाशी वा पृथ्वीवर, इव्हान फक्त भूतकाळ आठवत राही. भूतकाळातील चित्रे त्याला त्याच्या डोळ्यासमोर दिसत. अगदी अलीकडील चित्रे प्रथम दिसत व नंतर तो मागे जात जात बालपणापर्यंत पोचत --- व तिथे थांबत.

जर तो त्याला त्या दिवशी देण्यात आलेल्या मनुकांबद्दल विचार करू लागला, तर त्याचे मन लहानपणीच्या कच्च्या सुकलेल्या फ्रेंच प्लमच्या विशिष्ट वासाकडे आणि त्यामुळे तोंडाला सुटणाऱ्या पाण्याकडे, ओढले गेले असते. ते प्लम चोखतानाच्या सर्व आठवणी जाग्या झाल्या असत्या. त्याची दाई, भाऊ, त्यांची खेळणी! इव्हान स्वतःशी बोलला, “नको. मी त्या

आठवणी काढायला नको. ते फार त्रासदायक ठरते. त्याने परत स्वतःला वर्तमानकाळात, म्हणजे सोफ्याच्या मागील बाजूस असणाऱ्या बटणाकडे व रेक्झीनवरील घडीकडे आणले. ‘‘रेक्झीन महागाईचे होते. पण ते नीट बसले नव्हते. त्यावरून वाद झाला होता. ते वेगळ्या प्रकारचे भांडण होते व वेगळ्या प्रकारचे रेक्झीन होते. त्यावेळी आम्ही वडिलांची कामाची बॅग फाडली आणि त्यामुळे आम्हाला शिक्षा झाली. आईने आम्हाला मिठाईची पेटी आणली --- ‘‘ परत तो भूतकाळात शिरला. बालपणात पोचला. मोठ्या मुश्किलीने त्याने त्याचे मन त्यावरून काढून, दुसरीकडे वळवले.

नंतर त्या स्मृतीमालिकेबरोबर दुसरी स्मृतीमालिका त्याच्या मनात अवतरली --- की कसे त्याचे आजारपण वाढत वाढत वाईट अवस्थेला पोचले. जीवनाचे दुसरे अंगदेखील त्याने पाहिले. जीवनाचा जास्त भाग चांगला असलेला त्याने पाहिला. दोन्ही भाग एकत्र झाले. त्याने विचार केला, ‘जसजसे दुःख व वेदना वाढू लागल्या, तसतसे आयुष्य अधिकाधिक वाईट होऊ लागले. आयुष्याच्या सुरवातीला एकच तेजस्वी ठिपका होता. पण तो नंतर जास्त जास्त वेगाने, अधिकाधिक काळा होऊ लागला. मरणाकडे संकटकाळातील भत्त्याच्या वर्गाच्या वेगाने तो जवळ

येऊ लागला. उतारावरून वाढत्या प्रवेगाने येणारा दगड त्याला आठवला. जीवन म्हणजे शेवटाकडे चाललेला वाढत्या त्रासांचा गठ्ठा --- अती टोकाच्या वेदना! तो शहारून म्हणाला, "मी उडतो आहे --- " त्याने हलून विरोध करायचा प्रयत्न केला पण त्याला आधीच माहिती होते की विरोध करणे अशक्य आहे. तो थांबून, सोफ्याच्या मागे बघत राहिला. बघून डोळे दमले पण समोरील दृष्य, भयानक कोसळणे, धक्का व नासधूस, तसेच चालू राहिले.

तो स्वतःशी म्हणाला, "विरोध करणे अशक्य आहे! हे सर्व कशासाठी चालले आहे, हे मला समजले तर! पण तेदेखील शक्य नाही. मी जगायला पाहिजे तसे जगलो नाही, असे म्हणणे शक्य असेल तर कदाचित स्पष्टीकरण मिळेल. पण तसे म्हणणे शक्य नाही." कायदेशीर व बरोबर असलेली आयुष्याची नीतीतत्वे त्याला आठवली. 'काही झाले तरी ते कबूल करता येणार नाही.' जसे काही कुणी त्याचे हसू हिरावून घेणार आहे अशा थाटात, त्याने विरोधाभासात्मक रीत्या हसून, विचार केला. तो बोलला, "दुःख व मरण --- कशासाठी आहे? याचे काही स्पष्टीकरण नाही."

# अकरा

असाच अजून एक पंधरवडा गेला. त्यात इव्हान व त्याच्या बायकोने इच्छिलेले एक झाले. फेडोर पेट्रोव्हीचने त्यांच्या मुलीशी विवाहाचा प्रस्ताव मांडला. ते एका संध्याकाळी घडले. दुसऱ्या दिवशी प्रॅस्कोव्हया तिच्या नवऱ्याच्या खोलीत आली. त्याला ती बातमी कुठल्या छान तऱ्हेने सांगावी, याचा विचार ती करत होती. पण त्याच रात्री इव्हानच्या तब्येतीमध्ये नवीन वाईट बदल झाला. तिने त्याला अजूनही सोफ्यावर वेगळ्या अवस्थेत पडलेले पाहिले. तो सरळ समोर बघत, कण्हत, पाठीवर झोपला होता.

तिने त्याला औषधे घ्यायची आठवण केली. पण त्याने तिच्याकडे अशा नजरेने पाहिले, विशेषतः तिच्या बाबतीत इतका पराकोटीचा शत्रुत्वभाव त्या नजरेत होता, की ती काय सांगत होती, ते पूर्ण करू शकली नाही.

तो म्हणाला, “येशूसाठी मला शांतपणे मरू दे!”

ती जायला निघाली, तेवढ्यात शुभ प्रभात म्हणत, त्यांची मुलगी आली. त्याने बायकोकडे पाहिले तसेच तिच्याकडे पाहिले व तिने केलेल्या तब्येतीच्या चौकशीला कोरडेपणे उत्तर दिले, की

लवकरच तो सर्वांची त्याच्यापासून सुटका करेल. त्या दोघी स्तब्ध झाल्या व थोडा वेळ त्याच्याजवळ बसून, निघून गेल्या.

लिसा तिच्या आईला म्हणाली, “हा आपला दोष आहे का? पपा जसे काही आपल्यालाच दोष देत होते. मला पपांच्याबद्दल वाईट वाटते. पण त्यांनी आपला छळ का करावा?”

त्यांच्या नेहमीच्या वेळी डॉक्टर आले. त्यांच्यावरील रागीट दृष्टी न ढळवता, इव्हानने “हो” व “नाही” अशी उत्तरे दिली. शेवटी तो म्हणाला, “तुम्हाला माहिती आहे, की तुम्ही माझ्यासाठी काही करू शकत नाही. त्यामुळे मला एकट्याला राहू द्या.”

“आम्ही तुझी वेदना कमी करू शकतो.”

“तुम्ही ते देखील करू शकत नाही. मला आहे तसे राहू दे.”

डॉक्टर हॉलमध्ये गेले व प्रॅस्कोव्हयाला म्हणाले, की केस फार गंभीर आहे आणि आता फक्त एवढाच भयानक उपाय उरला आहे, की ओपियम देऊन त्याच्या वेदना कमी करणे.

डॉक्टर म्हणाले ते खरे होते, की इव्हानच्या शारीरिक वेदना भयानक होत्या. पण त्यापेक्षाही महत्वाच्या अशा मानसिक वेदना जास्त भयानक होत्या आणि तोच त्याचा मुख्य छळ होता.

त्या रात्री त्याने चांगल्या स्वभावाच्या व गालाची हाडे वर असलेल्या चेहऱ्याच्या गेरॅसीमला झोप आलेले पाहिले आणि त्याच्या मनात प्रश्न आला, “माझे सर्व आयुष्य चुकीचे असले, तर काय?”

त्याने त्याचे आयुष्य जसे योग्य प्रकारे घालवायला हवे होते, तसे घालवले नसल्याचे त्याला ठळकपणे जाणवू लागले. समाजमान्य लोकांकडून जे आदर्श ठेवले जातात, तसे अगदी थोडे दृष्य प्रयत्न त्याने दाबून टाकले. क्वचितच लक्षात येईल व जी खरी असेल, अशी उर्मी त्याने लगेच दाबून टाकली. बाकी इतर सर्व चुकीचे असेल. त्याची व्यावसायिक कर्तव्ये व त्याचा समग्र कौटुंबिक जीवनपट, त्याची सामाजिक, व्यावसायिक आवड, सगळे काही चुकीचे असेल. त्याने स्वतःशी त्याची भलावण करायचा प्रयत्न केला आणि अचानक त्याला त्यातील फोलपणा समजून आला. त्याची भलावण करण्यासारखे काहीच नव्हते.

तो स्वतःशी बोलला, ‘ जर असे असेल तर आणि मी असे जाणीवपूर्वक जीवन संपवत असेन, की मला मिळालेले सर्व मी फुकट घालवले व त्यात सुधारणा करणे शक्य नाही --- तर मग काय?’

त्याने पाठीवर पडल्या पडल्या आयुष्याचा नव्याने आढावा घायला सुरवात केली. सकाळी जेव्हा त्याने पहिल्यांदा नोकराला व त्याच्या बायकोला पाहिले, मग मुलीला व मग डॉक्टरांना पाहिले, तेव्हा त्यांचा प्रत्येक शब्द व हालचाल त्याला रात्री जाणवलेल्या भयानक सत्याची खात्री देऊन गेली. त्यांच्यात त्याला तो स्वतःदिसला --- तो ज्यासाठी जगला ते सर्व काही --- आणि त्याने स्पष्टपणे पाहिले की ते खरे नव्हते. ती जीवन व मरण लपवणारी भयानक मोठी फसवणूक होती. या जाणीवेने त्याचे शारीरिक कष्ट दहापटीने वाढवले. तो कण्हून चुळबुळ करू लागला. त्याला गुदमरवणारे व श्वास तोकडा पाडणारे कपडे ओढू लागला. त्याला ते नकोसे झाले.

त्याला ओपियमचा मोठा डोस देण्यात आला. तो बेशुद्ध झाला. पण दुपारी त्याच्या वेदना परत सुरु झाल्या. त्याने त्याच्याजवळून सर्वांना हाकलून दिले व कुशी बदलत तळमळू लागला.

त्याची बायको त्याच्याकडे येऊन बोलली, “माझ्या प्रिया, माझ्यासाठी एवढे कर. त्याने काही अपाय होणार नाही मदतच होईल. सुदृढ लोक नेहमी हे करतात.”

त्याने त्याचे डोळे सताड उघडले.

“काय? प्रार्थना? का? त्याची काही गरज नाही. तरीही --- “

ती रडू लागली.

“हो. प्रिया, ती कर. मी धर्मगुरुना पाठवते. तो चांगला मनुष्य आहे.”

तो म्हणाला, “ठीक आहे. पाठव.”

जेव्हा धर्मगुरु आले आणि त्याच्या पापांचा कबुलीजबाब ऐकला, तेव्हा इव्हान शांत झाला. त्याला संशयापासून मुक्ती मिळाली व दुःखापासूनही. क्षणभरासाठी तिथे आशेचा किरण चमकला. तो परत परत किड्यासारख्या आकाराच्या आंत्रपुच्छा संबंधी व ते बरे करण्यासंबंधी विचार करू लागला. त्याच्यासाठी प्रार्थना करण्यात आली. त्याच्या डोळयात पाणी उभे राहिले.

नंतर त्यांनी त्याला जेव्हा झोपवले, तेव्हा त्याला क्षणभर बरे वाटले. परत तो बरा होईल, असे त्याला वाटू लागले. त्याच्यासाठी सुचवण्यात आलेले ऑपरेशन करून घ्यायचा विचार तो करू लागला. तो स्वतःशी बोलला, “जगण्यासाठी! मला जगायचे आहे.”

त्याच्या बायकोने आत येऊन त्याचे अभिनंदन केले. नेहमीचे शब्द बोलतांना तिने म्हटले, “तुला बरे वाटते आहे, नाही का?”

तिच्याकडे न बघता तो म्हणाला, “हो.”

तिचे कपडे, तिची आकृती, तिच्या चेहऱ्यावरील भाव, तिच्या आवाजाचा स्वर सर्वातून एकच प्रतीत होत होते. “हे चुकीचे आहे. असायला पाहिजे तसे हे नाही. आजपर्यंत तू जे जगलास व अजून जगशील, ते चुकीचे असून, ती फसवणूक आहे. ते तुझ्यापासून जीवन व मरण लपवणारे आहे.” त्याने हा विचार मान्य केल्याबरोबर, त्याचा द्वेष, शारीरिक वेदना व मानसिक त्रास सुरु झाला. त्याबरोबरच अटळ अशा जवळ येणाऱ्या मरणाची जाणीव झाली. यातच ढवळून काढणाऱ्या आर्त दुःखाची व गुदमरल्याच्या भावनेची भर पडली.

तो हो म्हणाला, तेव्हा त्याच्या चेहऱ्यावरील भाव भयंकर होते. तसे बोलल्यावर, त्याने सरळ तिच्या डोळ्यात बघितले. त्याचा चेहरा भरभर, असामान्यपणे त्याच्या अशक्त अवस्थेत बदलला. तो ओरडला, “जा. इथून निघून जा. मला एकट्याला राहू दे.”

# बारा

त्या किंचाळण्याच्या क्षणापासून, ते तीन दिवस तसेच चालू राहिले. ते इतके भयंकर होते की दोन बंद दारांच्या आडून सुद्धा ते ऐकवत नसे. त्याने त्याच्या बायकोला उत्तर दिल्या क्षणापासून तो हरवला. आता तिथून परत फिरणे नव्हते. शेवट आला होता. मात्र त्याच्या शंका अजून फिटल्या नव्हत्या. त्या तशाच होत्या.

तो वेगवेगळ्या आवाजात ओरडत होता. “ओहो! ओहो! ओहो! मी नाही!” अशी सुरवात करून तो ओ या अक्षरावर थांबून ओरडत होता.

तीन दिवस त्याच्यासाठी काळ जणू अस्तित्वात नव्हताच. एका विरोध करण्यास अशक्य अशा अदृष्य शक्तीने तो काळ्या पोत्यात झगडत होता. काही उपयोग नाही हे कळत असून, त्याला मरणाकडे ओढणाऱ्या यमदूताशी तो झगडत होता. क्षणोक्षणी त्याला वाटत होते, की खूप प्रयत्न करूनही त्याला भीती वाटणाऱ्या कशाच्या तरी जवळ जात होता. काळ्या विवरात खेचला गेल्याने त्याची काळजी वाढत असल्याचे, त्याला वाटले. पण त्याहूनही जास्त विवशता तो पूर्णपणे आत न खेचला गेल्याने वाटत होती. त्याचे आयुष्य चांगले आहे, या खात्रीने तसे होणे

अवघड होत होते. त्या भरवशाने तो जागच्या जागी रहात होता व पुढे जात नव्हता. त्यामुळे त्याचा अधिक छळ होत होता.

अचानक त्याच्या छातीत व कुशीमध्ये जोराने काही लकाकले. त्याला श्वास घेणे त्रासदायक होऊ लागले. तो गर्तेत कोसळला तिच्या तळाशी उजेड होता. आपल्याला कधीकधी रेल्वेच्या डब्यात जाणवते, की आपण पुढे जात असतांना मागे गेल्यासारखे वाटते व अचानक खऱ्या दिशेची जाणीव होते, तसे त्याला वाटले.

तो स्वतःशी बोलला, ‘हो, हे काही बरोबर नाही. पण त्याचे काय एवढे? त्यावर काही करता येईल. पण काय करणे योग्य ठरेल?’ व शांत झाला.

हे तिसऱ्या दिवसाच्या शेवटी झाले. त्याच्या मृत्यूच्या दोन तास आधी. तेव्हा त्याचा शाळेत जाणारा मुलगा सरपटत अंथरुणाच्या कडेला आला. अजूनही इव्हान जोरात किंचाळून त्याचे हात हलवत होता. त्याचे हात मुलाच्या डोक्यावर पडले आणि मुलाने ते पकडून त्याच्या ओठांवर दाबले व रडू लागला.

त्याच क्षणी इव्हानला उजेड दिसला. त्याला समजले की जरी त्याचे आयुष्य जसे असायला पाहिजे होते तसे नव्हते, तरी ते

अजूनही सुधारता येईल. त्याने स्वतःला विचारले, “कुठली गोष्ट योग्य आहे? नंतर त्याला समजले की कोणीतरी त्याच्या हाताचे चुंबन घेत आहे. त्याने त्याचे डोळे उघडले. मुलाकडे पाहिले. त्याला मुलासाठी वाईट वाटले. त्याची बायको रागाने हातवारे करत आत आली. त्याने तिच्याकडे पाहिले. ती तोंड उघडे टाकून त्याच्याकडे बघत होती. तिच्या नाकागालावर अश्रू होते व चेहऱ्यावर दुःखी भाव होते. त्याला तिच्याबद्दलही वाईट वाटले.

त्याने विचार केला, ‘हो मी त्यांना फार दुर्दैवी व दुःखी बनवत आहे. ते दिलगीर आहेत पण मी मेल्यावर ते ठीक होतील.’ त्याला हे मोठ्याने बोलावेसे वाटत होते. पण तेवढी शक्ती नव्हती. ‘शिवाय बोलायचे कशाला? मला अभिनय केला पाहिजे.’ त्याने विचार केला. त्याने त्याच्या बायकोकडे बघत मुलाकडे निर्देश केला व म्हटले, “त्याला बाजूला ने --- मला त्याची दया येते आहे --- व तुझीही” त्याने असे म्हणण्याचा प्रयत्न केला, “मला क्षमा कर.” पण “मला क्ष --- “ एवढेच बोलू शकला. जेवढे समजायचे तेवढे समजेल, असा विचार करून त्याने फक्त हात हलवला.

आणि अचानक त्याला स्पष्ट झाले की, जे त्याला छळत होते व सोडत नव्हते, ते एकाच वेळी दोन्ही बाजूंनी फिके पडत चालले

आहे. दहा बाजूंनी, सर्व बाजूंनी. त्याला त्यांच्याबद्दल वाईट वाटले. 'ते दुखावले जातील, असे त्याने वागता कामा नये. त्याना सोडून द्यावे व स्वतःची यातनांपासून सोडवणूक करून घ्यावी'. त्याने विचार केला, 'हे किती चांगले व सोपे आहे. आणि वेदना? त्यांचे काय झाले? अग यातने, तू कुठे गेलीस?"

त्याने वेदनेकडे लक्ष वळवले.

"हो. ती इथे आहे. ठीक आहे. तिचे काय? ती तिथेच असू दे."

"आणि मरण --- ते कुठे आहे?

त्याने त्याची आधीची सवयीची मरणाची भीती शोधली. पण त्याला ती सापडेना. ती कुठे गेली? कुठले मरण? तिथे भीती नव्हती कारण तिथे मरण नव्हते.

मरणाच्या जागी प्रकाश होता. तो एकाएकी मोठ्याने उद्गारला, "किती आनंद!"

त्याच्या बाबतीत हे सर्व क्षणार्धात घडले आणि क्षणार्धाचा अर्थ बदलला नाही. जे तिथे हजर होते, त्यांच्यासाठी पुढचे दोन तास वातावरण शोकाकुल राहिले. इव्हानच्या घशात काहीतरी

अडकल्यासारखे झाले. त्याचे अस्थिपंजर शरीर थरथरले. मग धापा टाकणे व घशातील खरखर कमी कमी होत गेली.

त्याच्या जवळचे कोणी म्हणाले, “हे सर्व संपले!”

त्याने ते शब्द ऐकले व मनात परत उच्चारले.

तो स्वतःशी बोलला, “मरण संपले. आता ते नाही!”

त्याने एक श्वास घेतला, मोठा, दमलेला सुस्कारा टाकतांना मध्येच थांबला. शरीर ताणून धरले व मेला.

# अनुवादिकेची ओळख

## डॉ. वृषाली जोशी



B Sc, M A, M Ed, Ph D

२५ अनुवादित कथा मराठी मासिकामधून प्रसिद्ध झाल्या आहेत. ई साहित्यतर्फे वीस पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत.


मराठी व इंग्रजी माध्यमांच्या शाळाकॉलेजमध्ये अध्यापन केले आहे.

संशोधन प्रकल्पात सहभाग घेतला आहे.

कॉलेजमध्ये प्राचार्यपद भूषवले आहे.


सुगमसंगीत स्पर्धेत पारितोषिके, सिंथेसायझरवर गाणी वाजवण्याचा, कविता करण्याचा व शब्दकोडी बनवण्याचा छंद आहे.


संपर्क: वृषाली जोशी ७, अक्षय, २० तुळशीबागवाले कॉलनी पुणे ४११००९, चलभाष ९९२१७४६२४५






डॉ. वृषाली जोशी यांची पुस्तके


ज्या कव्हरवर क्लिक कराल
ते पुस्तक उघडेल
(नेट आवश्यक)












वृषाली जोशी
विश्वकथा-४


वृषाली जोशी
विश्वकथा१



वृषाली जोशी
विश्वकथा-३



वृषाली जोशी
साकीच्या कथा
HECTOR HUGH
MUNRO SAKI


वृषाली जोशी
विश्वकथा-२


THE PICTURE OF
DORIAN GRAY
द पिक्चर ऑफ
डोरिअन ग्रे
वृषाली जोशी
OSCAR WILDE



सॉमरसेटमॉम
मेजवानीपूर्वी
व इतर कथा
अनुवाद
वृषाली जोशी
BEFORE
THE PARTY



वृषाली जोशी
THE SHAKESPEARE
STORIES
A MIDSUMMER NIGHT'S DREAM
THE MERCHANT OF VENICE
शेक्सपिअरच्या चार कथा
Much Ado
about
Nothing
Twelfth
Night






शेरलॉक होम्स
भाग १ ते ८ (५० कथा)


ज्या कव्हरवर क्लिक
कराल ते पुस्तक उघडेल








## ई साहित्य प्रतिष्ठानचे हे तेरावे वर्ष.

## डॉ. वृषाली जोशी यांचे हे एकविसावे पुस्तक.

डॉ. वृषाली जोशी या मराठी व इंग्रजी या भाषांच्या विद्वान आहेत. त्या प्राचार्य होत्या. त्यांनी काही काळ विदेशातही राहून तेथल्या वाचन संस्कृतीचा अनुभव घेतला आहे. तशीच वाचन संस्कृती महाराष्ट्रातही निर्माण व्हावी असे त्यांना वाटते. इंग्रजीतील उच्च दर्जाचे निवडक लेखकांचे साहित्य मराठीत अनुवाद करून मराठी वाचकांची अभिरूची संपन्न व्हावी यासाठी त्या अतोनात कष्ट घेतात. तसे पहाता अनुवादित पुस्तकांना अनेक व्यावसायिक प्रकाशकांकडून मागणी असते. परंतू मराठीतील जास्तीत जास्त वाचकांपर्यंत आपले साहित्य जावे म्हणून त्यांनी ई साहित्यची निवड आपल्या पुस्तकांसाठी केली आहे.

डॉ. वृषाली जोशी यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली सर्व पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले(९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद(९), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(८), डॉ. नितीन मोरे (२८), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस

आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(२), अनंत पावसकर(४), मधू शिरगांवकर (६), अशोक कोठारे (५० खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १७ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (८), डॉ. वृषाली जोशी(२१), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (८), अंकुश शिंगाडे(९), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(३) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे(५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी लेखक ई साहित्यच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये। विशेषीं लोकीं 'इ'यें।

दृष्टादृष्ट विजयें। होआवे जी।